मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

या अंकांत

एक प्राचीन मराठी कवि गुणकीर्ति —विद्याधर जोहरापूरकर
विनोद या शब्दाविषयी थोडेंसें——
हास्य हें वस्तुनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ ? —म. ना. लोही
ग्रंथपरिचय —श्री. अप्रबुद्ध
शिवाय ग्रंथसमालोचन, संघवार्ता वगैरे.

वर्ष १२ संपादक : जुलै १९५७
अंक ४ पां. कृ. सावळापूरकर किंमत आठ आणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रचारकांस विनंती

विदर्भ साहित्य संघाचीं पावतीपुस्तकें ज्यांच्याकडे आहेत त्यांनी वसूल केलेली वर्गणी प्रत्येक महिन्याच्या दि. १२ पर्यंत वर्गणी व पावतीपुस्तकांतील मधला भाग कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी. या पद्धतीने ज्या सभासदांची वर्गणी आली आहे त्यांस 'युगवाणी 'चे अंक पाठविण्यास सोयीचें होईल, म्हणून ही व्यवस्था करावी लागत आहे.

आपला नम्र,
य. गो. मालोदे,
स्थानापन्न सरचिटणीस,
वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :
कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
य. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष १२ वें अंक ४

जुलै १९५७

संपादकीय

‘सह्याद्रि’ च्या निमित्ताने

कै. न. चिं. केळकर यांच्यासारख्या अग्रगण्य साहित्यिकांनी सुरूं केलेलें आणि गेलीं तेवीस वर्षें अखंड व नियमितपणे चालूं असलेलें मराठींतील एक अत्युत्कृष्ट मासिक ‘सह्याद्रि’ चालूं महिन्यापासून चालकांनी बंद केलें आहे, या घटनेचें अनेकांप्रमाणे आम्हांलाहि फार वाईट वाटत आहे. ‘सह्याद्रि’ हें उच्च अभिरुचीचें मासिक होतें म्हणूनच त्याचा आर्थिक संसार पहिल्यापासूनच ओढगस्तीचा होता, त्यांतच ‘वेजबोर्ड’ च्या निर्णयाचें नवें निमित्त होऊन सदरहू मासिकाला आपला श्वासोच्छ्वास बंद करावा लागला ही स्थिति मराठी साहित्याच्या भवितव्यासंबंधी गंभीर विचार करावयाला लागणारी आहे. ‘विविधज्ञानविस्तारा’ सारखीं जीं ज्ञानप्रधान मासिकें एकाकाळीं मोठ्या डौलाने चालत होतीं त्यांनाहि नव्या जमान्यांत आपला अवतार प्रथम संपवावा लागला; ज्यांना जगावयाचें होतें त्यांनी निदान आपलें थोडेंबहुत स्वरूपान्तर करण्याचा प्रयत्न करून कांही आयुष्य मिळविलें. ‘सह्याद्रि’ मासिकाने देखील अलिकडे आपला कायापालट करून स्वतःला थोडेसें रोचक आणि ‘हलकें’ करून घेतलें होतें. पण अशाहि स्थितींत त्या मासिकास जगणें अशक्य झालें यावरून उच्च मराठी साहित्याने एक तर पुरे बाजारू तरी व्हावें नाही तर मरून तरी जावें अशी आणीबाणीची परिस्थिति उत्पन्न झाली आहे असे अनुमान होते. पूर्वी मासिकांचें कार्य वाचकांत चांगली अभिरुचि निर्माण करणें व त्यांना यावच्छक्य रंजकतेने ज्ञानदान करणें हें होतें. अलिकडे बहुसंख्य वाचकांचें रंजन, त्यांच्या हीन प्रवृत्तीचें लालन आणि वर्धन हेंच कित्येक मासिकांनी आपलें जीवित-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कार्य मानलें असल्यामुळे चढाओढींत जुन्या प्रकारचीं मासिकें टिकेनाशीं झालीं. भरपूर खप हेंच मासिकांच्या चांगुलपणाचेंहि मापन बनल्यामुळे तो खप ज्या ज्या मार्गांनीं होईल त्यांचें त्यांचें अनुसरण करण्याची प्रवृत्ति बळावूं लागली. आमची कला, भाषाप्रभुत्व आणि विचारसौंदर्य या नव्या लोकशाही मार्गाने जाऊं लागलें. 'मूर्खहस्ते न दातव्यम्' हा पुस्तकांचा आर्तस्वर नाहीसा झाला आणि त्याजागीं 'मूर्खमेवाभिसर्तव्यम्' अशी नवी प्रतिज्ञा नवीं पुस्तकें करूं लागलीं! या सर्वांचा परिणाम उच्च ज्ञानाची पिछेहाट होण्याकडे होत आहे. पुष्टि आणि तुष्टी या दोन्हीं एकत्रित असणें हेंच आरोग्याचें लक्षण आहे. रंजकतेची तुष्टी आहे पण सुविचाराची पुष्टि नाही असें असेल, तर त्या साहित्यांत हितत्वाची सत्ता नाही असाच अनुभव येईल. मराठी मासिकांच्या अपमृत्यूचा इतिहास लक्षांत घेऊन निघणारीं अनुमानें आम्हांला इतउत्तर कार्यप्रेरक ठरोत अशी आशा करूं या. सरकारी निर्णय हें उच्च ज्ञानवृद्धीस वस्तुतः पोषक ठरावयाला पाहिजेत. पण प्रस्तुत बेजबोर्ड निर्णयाचा परिणाम कांही ठिकाणीं नेमका उलट होत आहे, याचाहि विचार होणें जरूर आहे.

अनुकूल काळाची संजीवनी प्राप्त होऊन 'सह्याद्रि' पुनः अवतीर्ण होवो अशी निदान इच्छा व्यक्त करूं या.

कै. डॉ. रा. द. रानडे

महाराष्ट्रांतील एक ख्यातनाम विद्वान महर्षि अलाहाबाद विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु आणि तत्वज्ञानाची साकार मूर्ति असणारे डॉ. रामभाऊ रानडे यांना गेल्या ६ जून रोजी निंबाळ येथील त्यांच्या आश्रमांत देवाज्ञा झाली हें वृत्त सर्वश्रुत झालें आहे. तत्त्वज्ञानाच्या व संत वाङ्मयाच्या अभ्यासकांना कै. डॉ. रानडे यांचे ग्रंथ अभ्यासल्यावाचून गत्यंतर नाही अशी त्या ग्रंथांची व त्या ग्रंथांतील तत्त्वें आचरणांत आणणाऱ्या ग्रंथकाराची योग्यता होती. महाराष्ट्रांतील आंतरराष्ट्रीय कीर्तीचा हा महर्षि दिवंगत झाल्यामुळे फार मोठी हानी झाली आहे. 'युगवाणी' या महर्षीला आपली श्रद्धांजलि अर्पण करून आपलें दुःख जाहीर करीत आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक प्राचीन मराठी कवि गुणकीर्ति

विद्याधर जोहरापुरकर, नागपूर

मराठी साहित्याचा बराच महत्त्वपूर्ण भाग अजून हस्तलिखितांच्याच रूपांत आहे हें विद्वानांना सर्वमान्य झालेलें सत्य आहे. गेल्या अर्धशतकांत महानुभाव संप्रदायाच्या ग्रंथांचें जें संशोधन झालें त्यावरून हें सत्य विशेषतः दृष्टीपुढे आलें आहे. गेल्या दोन वर्षांत नागपूर व कारंजा येथील हस्तलिखितांचें अवलोकन करतांना आम्हाला असें आढळून आलें की महानुभाव संप्रदाया-प्रमाणेच जैन संप्रदायाविषयींहि हेंच सत्य दृष्टोत्पत्तीस येतें. या हस्तलिखितांमधील दोन प्राचीन ग्रंथांवरून गुणकीर्ति या अज्ञात कवीचा परिचय प्राप्त होतो. त्याची संक्षिप्त माहिती देणें हाच प्रस्तुत लेखाचा हेतु आहे.

गुणकीर्तिविरचित पहिला महत्त्वपूर्ण ग्रंथ **धर्मामृत** हा होय.* हा ग्रंथ गद्य आहे ही त्याच्या अनेक विशेषतांपैकी सर्वांत महत्त्वपूर्ण होय. जैन संप्रदा-यांतील गृहस्थांच्या धर्माविषयीं अर्थात नैतिक आचरणा-विषयी या ग्रंथांत विस्ताराने उपदेश केला आहे. संस्कृतमध्ये स्वामी समन्तभद्र यांनी रचिलेला रत्नकरंड-श्रावकाचार हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याच्याच आधारें धर्मामृताची रचना झाली असावी असें या दोन ग्रंथांच्या तुलनेवरून स्पष्ट दिसतें.

धर्माचें स्वरूप कसें आहे याविषयीं संदेह निर्माण झालेला एक शिष्य गुरूला त्याविषयीं प्रश्न विचारतो अशी या ग्रंथाची सुरवात आहे--

आता श्रीगुरुचा प्रसादे। धर्माधर्म स्वरुप सांघेन। सिक्ष पूसते श्रीगुरुप्रति। देवा। दर्शने तरि सा। पाखांडे तरि साहाणो। एवं षट दर्शने। धर्म मारग जाले। एतुके देव जाले। एतुके गुरु जाले। आपुलाला. मति। पक्षपाति जन पडले। सत्य असत्य थापिते जाले। परि काही निवाडु नव्हिचि। तरि कवणु हा धर्मु साधावा। कवणु धर्मु करावा।

अशा रीतीने धर्मशास्त्र हा या ग्रंथाचा प्रमुख विषय असला तरी त्याला पुराणाचेंहि स्वरूप यावें अशी ग्रंथकर्त्याची इच्छा असावी असें उपर्युक्त जिज्ञासेच्या पुढील अंशावरून दिसतें--

जुग ते कवणे। जुगाचे भाव ते कैसे। संसार स्वरुप ते कैसे। उत्पत्ति प्रलयो तो कैसा। हे कृत्याकृत्य कवणाचे।--एवं श्रीगुरु सकल पदार्थु कृपा करौनि उपदेसीजो।

या जिज्ञासेची पूर्ति करण्याकरता प्रथम ग्रंथकर्त्याने जगताच्या सामान्य स्वरूपाविषयींचे विचार व्यक्त केले आहेत. जैन संप्रदायांत या जगताला लोक अशी संज्ञा असून हा लोक ईश्वरनिर्मित नसून स्वयंभू आहे--

ज्या आकासामध्ये लोकु प्रवर्ते। तो लोकु म्हणीजे। तो कैसा। जो अनंतानंत जीवे भरोतु। अनादिनिधनु। सहजस्वभाव संभरूप। कृत्यविर्वजितु।

ईश्वर हा जगताचा निर्माता नाही असें म्हटल्या-वर स्वाभाविकच असा प्रश्न निर्माण होतो की जैन संप्रदायाचें देवांच्या स्वरूपाविषयीं काय मत आहे? याला ग्रंथकर्त्याने विस्ताराने उत्तर दिलें आहे. प्राकृत भाषेंतील पंचनमस्कारमंत्र हा जैन समाजाला परम आदरणीय वाटतो. यांतील पहिला मंत्र 'णमो अरिहंताणं' याचें व्याख्यान करतांना लेखक म्हणतो--

देओ तरि अरिहंतु। वाचौनि एर सर्व देवता म्हणीजे। तरि कवण कवण देवता। ते सांघेन आता।

---

* या ग्रंथाची शक १६१० मध्ये लिहिण्यांत आलेली एक प्रति कारंजा येथील चंद्रप्रभमंदिरांत उपलब्ध आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इंद्रु देवता। अग्नि देवता।...कृष्णु देवता। दत्तु देवता। दत्तात्रयो देवता। चांग देवता। गोडम राउळ देवता। चक्र देवता। चक्रधर देवता। संकरु देवता। नवनाथ देवता। खांडेराउ देवता। मेगणाथु देवता। मैरालु देवता। वणगदेवु देवता।

ग्रंथकर्त्याने दिलेली ही देवतांची यादी वरीच विस्तृत आहे व त्यावरून तत्कालीन महाराष्ट्रीय समाजाच्या उपासनाविषयांची चांगली कल्पना येते. या सर्व देवता संसारांत मन घालणाऱ्या व भक्तांच्या सुखदुःखांमुळे सुखी दुःखी होणाऱ्या आहेत. या उलट अरिहंत हे संसारांतून मुक्त झालेले आहेत आणि सांसारिक सुखदुःखांचा त्यांच्यावर परिणाम होत नाही. त्यामुळेच अरिहंत हे आदर्श पुरुष व म्हणून 'देव' आहेत असा निष्कर्ष लेखकाने काढला आहे.

यानंतर गृहस्थांच्या धर्माचें वर्णन करतांना लेखक प्रथम अहिंसाव्रताचें वर्णन करतो. मध्ययुगांत अहिंसाव्रताचा संबंध विशेषतः खाद्यपेयांशीं जोडण्यांत आला होता. तदनुसार लेखकानेहि अभक्ष्य पदार्थांची बरीच मोठी यादी या प्रकरणांत दिली आहे. त्यांत मद्यमांसासारख्या स्थूलतःच त्याज्य असणाऱ्या पदार्थाबरोबरच पुढे दिल्यासारखे लहानसान नियमहि सूक्ष्मतेने नमूद केले आहेत—

आनि नासले अन्न। विटले। स्वादचलित दहि ताक। नेंघावे। जेया अन्नावरि फुलणि। सेवाल। ते परहरिजे।

दुसरें व्रत सत्य हें आहे. त्याच्या वर्णनानंतर अचौर्य व्रताकडे लेखक वळतो—

आता अचोरिज अनुव्रत ते कैसे। जे चोरि न करावी। कवण्हाचे अधिक नेघावे। उणे नेदावे। वाट उने न करावे। सागडी कानी न करावी। मापे अधिक उने न करावे।

चौथें व्रत ब्रह्मचर्य आणि पांचवें व्रत अपरिग्रह यांविषयींहि अशाच अनेक व्यावहारिक नियमांचा निर्देश करण्यांत आला आहे.

व्रताचरणानंतर सामान्य धर्माचरणाचें वर्णन करतांना तीर्थयात्रा प्रकरणांत लेखकाने जैन व जैनेतर तीर्थांची विस्ताराने गणना केली आहे—

त्रिंबकु। पंढरपुर। तुळजा। केदारो। स्वामिकार्तिक। सारणेश्वर। उडिसा जगन्नाथु। मल्लिकार्जुन। जटासंकरु। रिद्धपुरु। चांगदेव। चांबिल। चक्रतीर्थ। माहोर। त्रिमलु। लोणारु।—एवं आदि करौनि सर्व कुतिर्थे जाणावी।

याहि यादीवरून महाराष्ट्राच्या तत्कालीन समाजजीवनावर वराच प्रकाश पडतो.

द्वादशानुप्रेक्षा हा गुणकीर्ति विरचित दुसरा ग्रंथ होय.† संसाराच्या स्वरूपाविषयीं वैराग्य निर्माण होण्याकरता थोर पुरुष ज्या बारा भावनांचें चिंतन करतात त्यांना अनुप्रेक्षा असें नांव आहे. प्राकृतामध्ये स्वामिकुमार व कुंदकुंद यांनी लिहिलेले अनुप्रेक्षा ग्रंथ जैन वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत. त्यांच्याच आधारें प्रस्तुत ओवीबद्ध ग्रंथ गुणकीर्तीने लिहिला आहे. पुढे दिलेल्या प्रातिनिधिक उद्धरणांवरून या बारा भावनांच्या मुळांतील विवरणाची वरीच कल्पना येऊं शकेल—

१ अनित्यानुप्रेक्षा तो कैसी।
संसार प्रवृत्ति सर्पा जैसी॥
अथवा सागरी वेला तैसी। संसृति प्रवृत्ती॥२१॥

जे जे महा सुंदर दीसे। ते ते क्षनामध्ये नासे।
विखे अग्नी अरी जैसे। मृत्य घडे॥२२॥

२ अशरणानुप्रेक्षा॥
वाघामुखि पडले हरण। तेने कवणा जावे सरण॥
तैसे कालामुखि जीवन। कवण राखे॥७०॥

जमा जाल्या झडपनी। न चाले काम नटे मनी॥
मंत्र जंत्र तंत्र झाडनी। केली न वांचिजे॥७६॥

सरण रीघिजे अरिहंता। सरण रीघिजे सिद्धनाथा॥
सरण रीघिजे साधुसंता। महंतांते देवा॥९३॥

३ संसारानुप्रेक्षा॥
या संवसारिचे सुख कैसे। हलाहल गोड जैसे॥
निर्वाणी जिवित नासे। क्षनामाजि पै॥११७॥

---

† या ग्रंथाच्या शक १५१४ व शक १६२४ मध्ये लिहिण्यांत आलेल्या दोन प्रति नागपूरच्या सेनगण मंदिरांत उपलब्ध आहेत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४ एकत्वानुप्रेक्षा ।
जीवा एकल्याजी येणे जाने ।
एकल्याजी उतपति मरणे ॥
एकल्या सुखदुख भोगने । पाहीजो पां ॥१३१॥
५ अन्यत्वानुप्रेक्षा ॥
हे सरिर नव्हे आत्मयाचे, आत्मा स्वरुप नव्हे शरीराचे॥
येथ कवणु कवणाचे । संवसारामाजी ॥१६०॥
६ अशुचि अनुप्रेक्षा ॥
असुची वस्त सभराभर । जैसें मातंगाचे घर ॥
ऐसें हे कुश्विल सरीर । अपवित्र देखा ॥१९०॥
सरिराते ममत्व सांडावे। परमतत्वी जिव मांडावे॥
अनंत कर्मे खंडावे । मुक्तिकारण ॥२०३॥
७ आस्रवानुप्रेक्षा ॥
हे आस्रव म्हणिजेती कैसे, वस्त्रासी मल लागति जैसे॥
कर्ममल जीवासि तैसे । लागति देखा ॥२१४॥
जितुके कुड कपट माया । प्रपंचु कुश्चील वाया ॥
असुद्ध मव वचन काया । कर्मे जोडती ॥२१९॥
८ संवरानुप्रेक्षा ॥
सर्व अस्रवाचा कीजे निरोधु, मनी नानिजे विखयवादु॥
एने करुनि पाविजे खेदु । परमपदाचा ॥२४४॥
९ निर्जरानुप्रेक्षा ॥
आंबे घालिजति जेवनी । पाविजे उबेचा दारती ।
तैसी कर्म योगाग्नी । पाकु कीजे ॥२६६॥
परीसह आनि कायक्लेसे । परमतत्त्वाचा भरवसे ॥
करा सम्यक्त्वसरसे । करि कर्मनिर्जरा ॥२७३॥
१० लोकानुप्रेक्षा ॥
अधो मध्य ऊर्ध्व भेद । लोकु जानावा त्रिविध ॥
अकृत्रिम सहज सिद्ध । स्वयंभु देखा ॥ २७६
हा षट्द्रव्ये भरला असे । परि कवनाचा केला नसे ॥
सद्‌गुरुवचने ऐसे । निर्धारु देखा ॥ २७७
११ बोधिदुर्लभानुप्रेक्षा ॥
गोमध्ये कामधेनु सुरस । धातुमध्ये हेमप्रकास ॥
तैसे दुर्लभ विसेस । मनुष्यजन्म ॥ ३२१
जे उत्तम कुलाचे सार । दुर्लभ आचार विचार ॥
भावभक्ति संयम भार । दुर्लभ देखा ॥ ३२४
१२ धर्मानुप्रेक्षा ॥
धर्मु जानावा दाहा लक्षनी । दृढ पाळावा निज मनी ॥
प्रथम उत्तम क्षमा जानी । दुजे मार्दव पैं ॥ ३४५
आर्जव गुण तिसरा । चौथे सत्य गुण उन्चरा ॥
पांचवे सौच मनी धरा । अंतर बाह्य ॥३४६
साहावा पाळिजे संयमु । सातवा धरिजे तप नेमु ॥
आठवा सर्वत्याग उत्तमु । भोगोपभोगा ॥ ३४७
नव्हा गुण तो आकिंचन । सर्व पदार्था राहे उन्नमन ॥
....ब्रह्मचर्य गुण दाहावा ॥

या बारा अनुप्रेक्षांच्या चिंतनाने तीर्थंकरांचें वैराग्य दृढ होतें व मग ते राज्योपभोगाचा त्याग करून मुनिदीक्षा घेतात अशी पौराणिक पार्श्वभूमि लेखकाने प्रस्तावनेंत दिली आहे.

धर्मामृत व द्वादशानुप्रेक्षा या दोन्ही ग्रंथांत गुणकीर्तीने या ग्रंथांच्या रचनेचा काळ, स्थळ अथवा आपली परंपरा यांचा निर्देश केलेला नाही. वर नमूद केल्याप्रमाणे द्वादशानुप्रेक्षा या ग्रंथाची एक प्रति शक १५१४ अर्थात सन १५९२ मध्ये लिहिण्यांत आली आहे. त्यावरून १५९२ च्या पूर्वी गुणकीर्तीचा काळ आहे, हें स्पष्ट आहे. परंतु या दोन्ही ग्रंथांतील भाषेवरून यापूर्वी निदान दोनशें वर्षे तरी गुणकीर्तीचा काळ असावा असें वाटतें. विशेषत: धर्मामृत या ग्रंथाची भाषा या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. महानुभाव संप्रदायाच्या देवता व तीर्थक्षेत्रें यांचा जो निर्देश या ग्रंथांत आहे त्यावरूनहि लेखकाच्या काळाविषयी हें अनुमान करतां येई⁻. कारण १४ व्या शतकानंतर हळूहळू महानुभाव संप्रदायावर गुप्ततेच्या वातावरणाची छाया पडूं लागली होती. तेव्हा त्यापूर्वी म्हणजे १४ व्या शतकांत गुणकीर्तीने हे दोन ग्रंथ लिहिले असावे असें अनुमान होतें.

लेखकाच्या या प्राचीनत्वामुळे महाराष्ट्रीय जैन समाजाच्या व मराठी साहित्याच्या इतिहासाच्या दृष्टीने या दोन ग्रंथांचें विशिष्ट महत्त्व आहे व त्या दृष्टीने त्यांचें योग्य संपादन झालें तर तें इष्ट होईल.

———

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यविषयक टिप्पणी :

विनोद या शब्दाविषयीं थोडेंसें—

म. ना. लोही

मराठींत 'विनोद' हा शब्द इंग्रजींतील Humour याचा पर्याय म्हणून वापरला जातो. Humour हा शब्द व्यापक अर्थानें रूढ असला तरी त्याचा अर्थ स्वभाव आणि घटना यावर आधारलेला उच्च दर्जाचा विनोद असाच सामान्यतः केला जातो. पण इंग्रजींत टीका करतांना मराठीप्रमाणे सरसकट विनोद (Humour) हाच शब्द वापरला जात नाही. ललितवाङ्मयाच्या निरनिराळ्या प्रकारांत विनोद हा निरनिराळ्या प्रकारांनी अवतरतो व त्याचें मूल्यांकन यथोचित व्हावयास पाहिजे. वस्तुस्थिति मात्र अगदीच वेगळी आहे.

सामान्यतः इंग्रजींत Humour आणि wit ही Laughter चीं दोन अंगें मानलीं जातात. Humour मध्ये Comic, Fun आणि Jock यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव केला जातो. म्हणजेच या तिन्ही प्रकारांतून विनोद (Humour) निर्माण होतो. पण त्याचा दर्जा हा वेगवेगळा असतो. Humour हा उच्च श्रेणीचा तर Comic आणि Fun कांहीशों कनिष्ट प्रकारची. कांही साहित्यशास्त्रकारांनी तर wit चा देखील Humour मध्ये अंतर्भाव केलेला आहे. Jock आणि Wit या बहिणीच. Wit मोठी बहीण तर Jock लहान. इंग्रजी टीकाकारांचा कल अचूक शब्द वापरण्याकडे असतो. उलट आपले समीक्षक सरसकट विनोद या शब्दाचा वापर करतांना आढळतात. ही पद्धति अनिष्ट व अनर्थकारी आहे असें मला सुचवावयाचें आहे. त्यामुळे साहित्यिकाला अन्याय होण्याचा संभव फार असतो.

तरी मराठी टीकाकारांनी वाङ्मयसमीक्षा करतांना गल्लत न करतां योग्य व अचूक शब्द वापरावे. Humour आणि Comedy यांचा अविभाज्य असा सनातन संबंध असल्यामुळे नाटकापासूनच सुरुवात करूं या.

मराठींत सर्वांत मोठी अडचण अशी आहे की, Comic, Fun, Jock यांसाठी निश्चित शब्द रूढ नाहीत. तरी तसे शब्द रूढ केले जावेत. विवेचनाच्या सोयीसाठी मी Comic ला विदूषकी विनोद, Fun ला मनोरंजक विनोद आणि Jock ला विनोदी चुटका असे शब्द सुचवतों. नाटकांत उच्च विनोद (Humour), विदूषकी विनोद (Comic), मनोरंजक विनोद (Fun) आणि हास्योत्पादक विनोद (Jock), शिवाय कोटि (Wit), या सर्वांचा वापर नाटककार आपापल्या मगदूराप्रमाणे करीत असतो. म्हणून कोणत्याहि नाटकाचें मूल्यमापन करतांना विनोदाच्या या अंगांपैकी कोणतीं अंगें प्रकट झालीं आहेत हें पाहून त्या त्या प्रकाराचा दर्जा निश्चित केला जावा.

विदूषकी विनोदाला हल्ली निकृष्ट दर्जाचें समजण्यांत येते. मात्र पूर्वीच्या नाटकांत हा विदूषकी विनोदच अधिक असे. कोल्हटकरांनी विदूषकाबरोबरच विदूषकी विनोदाचें उच्चाटन केलें हें खरें; पण त्यांच्या सर्वच समकालिनांना तें जमलें नाही. खाडिलकरांच्या नाटकांत हाच विदूषकी विनोद आहे. तो सुसंस्कृत प्रेक्षकांना आकर्षक वाटत नसला तरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सामान्य प्रेक्षकांची पुरेपूर करमणूक करतो. आणि नाटक हें समाजांतील सर्वच थरांच्या लोकांसाठी असतें. जुन्या नाटकांतून असा विदूषकी विनोद विपुल प्रमाणांत आढळतो. कारण ती विनोद–विकासाची प्रथमावस्था होती. शिवाय विनोदाला उच्च अशी परंपरादेखील नव्हती. शाकुंतल, मृच्छकटिकांतील माढव्य आणि मैत्रेय यांचा विनोद विदूषकी स्वरूपाचाच नाही का ? इंग्रजींत सुद्धा विनोदी लेखकाला Comic Writer, शेक्सपियरला Comic Poet असें संबोधिलें जाई. Humorist किंवा Humourous हे शब्द अलिकडचे आहेत.

मनोरंजक विनोदाचा वापर देखील नाटकांत सर्रास केला जातो. विनोदासाठी विनोद करणाऱ्या किंवा करमणूकीला प्राधान्य देणाऱ्या जोशी, अत्रे यांच्या नाटकांत पुष्कळच मनोरंजक विनोद (Fun) आहे. गडकरी आणि वरेरकर यांच्या नाटकांतूनहि मनोरंजक विनोद बराच आढळतो. पण त्याची तशी दखल कोणी घेत नाही. धुंडिराजाची बडबड ही या सदरांतच जमा होणारी आहे. उपहासगर्भ लेखनाचा यांत अंतर्भाव होऊं शकतो. उपहासगर्भ विनोद हा वेगळा प्रकार आहे, हें निर्विवाद. तथापि उपहासगर्भ लेखनांतून जो विनोद निर्माण होतो तो मनोरंजक असतो.

आपले टीकाकार Jock आणि Wit यांची देखील गल्लत करतांना दिसून येतात. तथापि Wit ही Jock पेक्षा भिन्न आहे. कोटीमध्ये दोन गोष्टींचा अनपेक्षित संबंध जोडलेला असतो. त्यामुळे. त्यांतील विरोध जाणवून हसूं येतें. उलट Jock मध्ये एखादी गर्भित कल्पना असते. ती देखील अनपेक्षित असते. त्यामुळे अपेक्षाभंग होऊन हसूं येतें. हसविणें हें हास्योत्पादक विनोदाचें (Jock) मुख्य काम. पण या दोन भिन्न गोष्टी आहेत याची फारशी दखल आमचे टीकाकार घेतांना आढळत नाहीत.

विनोदाचा आणखीहि एक प्रकार म्हणजे Absurdity अगर मूर्खपणावर आधारित विनोद. सर्वच भाषांतून मूर्खपणावर आधारलेला विनोद आढळतो. मूर्खपणा हा व्यक्तीचा दोष नसला तरी तो हास्योत्पादक असतो. विनोदी लेखक तर अशा गोष्टींच्या शोधांतच असतो. मूर्खपणावर आधारलेला विनोद हा हृदयशून्य असतो असें समजण्याचें कारण नाही. जेथे विनोदाचा जन्मच दुःख हलकें करण्यासाठी आहे तेथे स्वभावदोषांवर आधारित विनोदाला त्याज्य किंवा तुच्छ समजण्याचें कारणच नाही. एकूण, विनोदाची जात निश्चित करून त्याची शहानिशा व्हावी एवढेंच मला सुचवावयाचें आहे.

मराठींत आणखी जी गल्लत होते ती विनोदाच्या दुसऱ्या जातीच्या उपांगांच्या बाबतींत. Satire, Sarcasm आणि Irony यांत गर्भित विनोद असतो. पण त्यांना विनोद म्हणणें बरोबर नाही. आधी विनोदाची जात निश्चित व्हावी. लेखकाचा उद्देश लक्षांत घेतला जावा. त्याच्या सफलतेचा विचार केला जावा. अमक्या लेखकाचा विनोद हा कुत्सितपणे केलेला आहे म्हणून निकृष्ट दर्जाचा, असें मोघम विधान करणें हा त्या लेखकाला अन्याय होतो.

या लहानशा टिप्पणींत मला हीच तक्रार समीक्षकांपुढे मांडावयाची आहे की त्यांनी विनोद या शब्दाच्या अर्थाला मर्यादा घालून योग्य ठिकाणीं योग्य शब्दांचा वापर करावा. विनोदाची जात निश्चित करावी. मग त्याची श्रेणी ठरवावी. Humour हेंच एकमेव गमक मानूं नये.

‘श्री गुरुदेव’

मानवसमाजाच्या सर्वांगीण उन्नतीस
वाहिलेलें मासिक

श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज, मोझरी

हिंदी-मराठी विभागात्मक — वा. मूल्य रु. ५]
हिंदी विभागात्मक — [वा. मूल्य रु. ३

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हास्य हें वस्तुनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ ?

मॅक्डुगल हास्य ही सहजप्रवृत्ति (Instinct) मानतो. म्हणजेच हास्य निर्हेतुक असूं शकतें हें तो मान्य करतो. उलट माणसाचें हास्य निर्हेतुक नसतें अशी सामान्यत: कल्पना असते. मग हास्याचें कारण शोधलें जातें, एखादा प्रसंग (Situation) किंवा एखादी व्यक्ति पाहून आपण हंसतो. म्हणून त्या वस्तूंतील, घटनेंतील अगर व्यक्तींतील औचित्य-विसंगति (हा श्री. वा. ल. कुळकर्णी यांचा शब्द आहे) हीच हास्याचें कारण. म्हणजेच हास्य हें वस्तुनिष्ठ (Objective) आहे, अशी विचारसरणी मांडली जाते. पाश्चात्त्य मानसशास्त्रवेते आणि मीमांसक बर्गसाँ व बेन, हॉब्स व हॅझलिट मॅक्डुगल व मेरिडिथ यांनी याच दृष्टिकोणांतून हास्य–विनोद मीमांसा केलेली आहे. मराठींतील टीकाकारांनी त्यांचें अंधानुकरण केलें नाही. कै. न. चिं. केळकरांनी अशी उपपत्ति मांडली आहे कीं, माणसाची सामान्य व्यवस्था, स्थिति व प्रमाण यांबद्दलच्या रूढ कल्पनेला धक्का बसला म्हणजे बहुधा हास्य निर्माण होतें. यांत 'बहुधा' हा शब्द घालायला मात्र ते विसरले नाहीत. डॉ. वाटवे यांनी 'माणसाला हंसवतें तें विसंगतिदर्शन, पदार्थ नव्हे' असें प्रतिपादन केलें पण स्पष्टीकरण मात्र केलें नाही. डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये यांनी 'हास्य वस्तुनिष्ठ तसेंच व्यतिनिष्ठ आहे' असें लिहिलें. त्याची शहानिशा मात्र केली नाही. श्री. वा. ल. कुलकर्णी यांनी याबाबत मौनच स्वीकारलें आहे. तथापि एवढें निश्चित, कीं मराठींतील विचारवंतांना हास्याच्या व्यक्तिनिष्ठ स्वरूपाबद्दल संशय येऊं लागला होता. खात्री पटली असावी असें मात्र वाटत नाही. म्हणूनच हास्य हें व्यक्तिनिष्ठच असतें ही भूमिका येथें स्पष्ट करावयाची आहे.

प्रस्तुत प्रश्नाचा विचार करतांना आपल्याला विरुद्ध दिशेने जाणें सोईचें पडणार आहे. म्हणून आपण 'आपल्याला हंसवील असें एखाद्या प्रसंगांत (Situation) काय असतें ?' हा प्रश्न सोडून देऊन 'विशिष्ट परिस्थितींत आपल्याला हंसायला लावील असें आपल्यांत काय असतें ?' असा प्रश्न उपस्थित करूं.

मानसशास्त्रीय दृष्टया हास्याचें संपूर्ण विवेचन डॉ. वाटवे यांनी आपल्या 'रसविमर्शा'त केल्यामुळे पुन्हा त्याची उजळणी करण्याची जरूर दिसत नाही. हास्याची भावना प्राथमिक स्वरूपांत सर्वच प्राण्यांत दृग्गोचर होते, याची त्यांना जाणीव असावी असें त्यांच्या विवेचनावरून वाटत नाही. पण मानसशास्त्रज्ञांनी या सिद्धांताला मान्यता दिलेली आहे. डॉ. वाटव्यांचें स्मरण होण्याचें कारण असें की, हास्यप्रवृत्ति ही एक सहजप्रवृत्ति असल्याचें ते मान्य करतात.

हास्य हें अशा प्रकारें Instinctive असल्यामुळे सहजप्रवृत्ति प्रत्यक्षपणे चाळवल्या गेल्याने त्याचा उद्भव होऊं शकतो किंवा त्या अप्रत्यक्षपणे अनुभवद्वारें चाळवल्या गेल्याने निर्माण होऊं शकतें. म्हणजे हास्य हें दोन प्रकारचें असतें. हास्याचे सर्वच प्रकार या दोन प्रकारांत अंतर्भूत होतात. ते दोन प्रकार म्हणजे सहजप्रवृतींतून उद्भवणारें हास्य आणि स्थिरवृत्तींतून उद्भवणारें हास्य. स्वाभाविक किंवा शुद्ध स्वरूपाचें हास्य केवळ शिशूच्याच ठिकाणीं दिसून येतें. ज्ञान आणि अनुभव यामुळे सहजप्रवृत्तीचें स्थिरवृत्तींत रूपांतर होऊं लागतें. मग शुद्ध स्वरूपाच्या सहजप्रवृत्त हास्याचा लोप होत जातो. असें असलें तरी Instinctive हास्याचे प्रकार सांगताच येणार नाहीत असें मात्र नाही. त्यांचें स्वरूप विशुद्ध नसेल कदाचित. मात्र त्याची वर्गवारी लावतांना त्याला सहजप्रवृत्त हास्यांतच घालावें लागेल. माता आपल्या लाडक्या अपत्याचें वागडणें पाहून जें वात्सल्यपूर्ण हंसते तें हास्य, प्रियकराकडे पाहून प्रेयसी जें हास्य करते तें, विजयोन्मादाने माणूस हंसतो तें अगर अनपेक्षित आनंदाची वातमी ऐकून येतें तें हंसूं, हे सर्व प्रकार Instinctive या सदरांत मोडतात. म्हणजे हास्योत्पादकता ही बाह्य चेतक (Stimulant) वस्तूंत नसून तीं आपल्यांतच वास करीत असते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हंसण्याची प्रवृत्ति नैसर्गिक असल्यामुळे बाह्य चेतक वस्तु ही सहजप्रवृत्तीला चेतविते. हंसण्याला प्रवृत्त करते. आपण वस्तूला अगर प्रसंगाला किंवा प्राण्याला हंसत नाही. त्या प्रसंगामुळे किंवा प्राण्यामुळे आपण हंसण्याला उतावीळ होतो.

कोणतीहि वस्तू, व्यक्ति अगर घटना आपल्या हास्यप्रवृत्तीला चाळवून आपल्याला हंसण्याला प्रवृत्त करते, कारणीभूत होत नाही हें आपण पाहिलें. आतां आपल्यांत असें काय असतें कीं जे आपल्याला हंसवितें? त्याला इंग्रजींत नांव आहे,—Incongruity of perception—कोणत्याहि वस्तूसंबंधींच्या ज्ञानांतील विसंगति. या विसंगतीचा परिचय कै. न. चि. केळकरांनी आपल्या हास्य-विनोद-मीमांसेंत दिलेला आहे. तरी त्याचें स्वरूप विशद करणें अप्रस्तुत होणार नाही.

प्रत्येकालाच आपल्या भोवतालच्या सुसंबद्धतेची, सुव्यवस्थेची आणि सुसंगतीची कल्पना असते. माणसानें कसें वागावें, कसें बोलावें-चालावें, कसा पोषाख करावा, याबद्दलची आपली निश्चत धारणा असते. त्या धारणेला धक्का देणारी एखादी घटना, व्यक्ति अगर वस्तू नजरेला पडली कीं, आपल्याला आपोआप हंसू येतें. हा सर्वसाधारण नियम असल्यामुळे हास्याच्या स्वरूपाविषयीं घोटाळे निर्माण झाले. वस्तुनिष्ठ दृष्टिकोणाचें पुष्टीकरण झालें. हास्याशीं वस्तूचा, व्यक्तीचा किंवा प्रसंगाचा संबंध जोडला गेला. घटनेंतील नाविन्य, वैचित्र्य आणि अनपेक्षिता ह्याच हास्यकारण समजल्या जाऊं लागल्या. वस्तुत: या गोष्टी हास्योत्पादक प्रसंगांत असतात. त्या हास्यप्रवृत्तीला चेतना देतात, तथापि त्या हास्याला कारणीभूत होत नाहीत. हास्याला कारणीभूत होते ती आपल्या अनुभवसंपादित ज्ञानांतील आणि प्रत्यक्ष ज्ञानांतील विसंगति (Incongruity). म्हणजेच आपण आपल्याशींच व आपल्यासच हंसतो. आपण कसें बनलों या जाणीवेनें हंसतों.

या प्रमेयाला पुष्टी देणारा दुसरा युक्तिवाद असा—हास्याला कारण जर बाह्य पदार्थ किंवा प्रसंग आहे तर त्याची प्रतिक्रिया सारख्याच प्रमाणांत व्हायाला नको काय? साखर गोड असते आणि मीठ खारट असते. त्यांचा स्वाद सर्वांना सारखाच लागतो ना? (एखादा अपवाद सोडून द्यावा लागेल) मग हास्याला कारण जर वस्तू असती तर तिची प्रतिक्रिया सर्व व्यक्तींत सारख्याच प्रमाणांत आढळली असती. पण ती तशी आढळत नाही. वेडा अगर विदूषक पाहून लहान मुलें आणि असंस्कृत माणसें यांना मनसोक्त हंसू येतें तर सुसंस्कृत माणसाला मुळीच हंसू येत नाही. असें कां व्हावें? कारण हास्य हें व्यक्तिनिष्ठ (Subjective) आहे. या संबंधांत श्री. व्ही. के. पेनन लिहितात—'The incongruity is entirely within ourselves, that is an incongruity between our present perception of the object and the previous knowledge of it.' (A Theory of laughter) विसंगति ही सर्वस्वी आपल्यांत म्हणजे आपल्या पूर्वज्ञानांत आणि वर्तमान ज्ञानांत असते. पर्यायानें

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र

प्रतिष्ठान

दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि विषयांवरील मौलिक साहित्य

आजच वर्गणीदार व्हा

वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाड्याबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.

"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हास्य हें व्यक्तिनिष्ठ असाच निष्कर्ष निघत नाही काय ?

येथे संस्कृतांतील आत्मस्थ व परस्थ हास्याचा उल्लेख करणें अयोग्य होणार नाही. भावप्रकाशांत सांगितलेल्या या दोन प्रकारांचा कदाचित बादरायण संबंध जोडतां येईल. तो असा कीं, आत्मस्थ हा हास्य-प्रकार वस्तुनिष्ठ हास्यप्रकार म्हणता येईल. परस्थ हास्यप्रकाराला सहानुभूतिजन्य हास्यप्रकार म्हणावें लागेल. रसविमर्शकार लिहितात–' जेव्हा विभावांच्या प्रत्यक्ष दर्शनानें हंसें येतें तेव्हा तो आत्मस्थ हास्यप्रकार व जेव्हा विभावांचें दर्शन आपणांस झालेलें नसतें–केवळ दुसरा हंसतो आहे त्यामुळे आपणांस हंसें येतें–तो परस्थ प्रकार.' यावरून आपण चर्चिलेल्या प्रकारांत व वरील प्रकारांत साम्य नाही हें उघड आहे.

हास्य हें नेहमी एकाच प्रकारचें नसतें. तथापि, हास्याच्या सर्वच प्रकारांचा अंतर्भाव Instinctive किंवा Sentimental या प्रकारांत होतो. म्हणून त्याची सविस्तर चर्चा करण्याची आवश्यकता दिसत नाही. उभय प्रकार हे व्यक्तिनिष्ठ व आहेत हें नव्याने सांगावयाला नकोच !

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

अल्प परिचय

स्थापना—१३ जानेवारी १९२३, अमरावती.

नागपुरास स्थलांतर—मार्च १९५०

रौप्यमहोत्सव—१९४८, गोंदिया

विश्वस्तमंडळ—१. लो. ना. डॉ. मा. श्री. अणे
२. कुलगुरु न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति
३. संघाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे (पदसिद्ध)

शाखा—खामगांव, अमरावती, चांदा, हिंगणघाट, वर्धा, रामटेक, तुमसर, गोंदिया, भंडारा, पुसद व यवतमाळ.

उद्देश—मराठी भाषा आणि साहित्य यांच्या अभिवृद्धयर्थ प्रयत्न करणें.

कार्य—विदर्भ साहित्य मंदिराची इमारत व नाटचगृह पूर्ण करणें, मराठीच्या परीक्षा घेणें, युगवाणी मासिक चालविणें, वाङ्मयीन ग्रंथ प्रकाशित करणें, साहित्यिक कार्यक्रम आयोजित करणें, संशोधन करणें व मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक कार्य करणें.

वार्षिक वर्गणी—साधारणसभासद—३ रु.; आजीव—५० रु.; हितचिंतक—२५० रु.; सहाय्यक—५०० रु.; आश्रयदाते—१००० रु.; उपकर्ते—५००० रु.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथपरिचय श्रीमहाभारतसार

श्री. अप्रबुद्ध

माझे मित्र श्री. शंकरराव सरनाईक यांनी संकल्पिलेल्या 'श्रीमहाभारतसारा'चा प्रथम खंड सुमारें तीन वर्षांपूर्वी वाचकांनी चाखला. आता त्याचे पुढील दोन खंड पुरे होऊन श्री. सरनाईक यांचा संकल्प पुरा होत आहे ही फार समाधानाची गोष्ट आहे. या ग्रंथावर मी आपला अभिप्राय द्यावा अशी त्यांची अपेक्षा असल्यामुळे मी प्रथम खंडासंबंधी माझे विचार मागे 'तरुण भारतां'त प्रसिद्ध केले. या दोन खंडांवरहि मी तसेंच कांही लिहीन, असें त्यांनी येथे ते आले असतां समक्षच मजकडून कबूल करून घेतल्याप्रमाणे पुढील विचार मी थोडक्यांत प्रकट करीत आहे.

सहा ऋषिपत्न्यांनी संगोपित केलेल्या षडाननाप्रमाणे डॉ. पट्टाभिसिताराम, लो. ना. बापूजी, सरसंघचालक गुरुजी, साहित्याचार्य बाळशास्त्री, पंडितराज राजेश्वरशास्त्री, श्री. कन्हयालाल मुनशी यांच्या सारख्या मोठमोठ्या प्रस्थांनी गौरविलेल्या 'भारतसारा'वरील माझ्यासारख्या अप्रबुद्धाच्या अभिप्रायाची अपेक्षा श्री. शंकरराव यांनी कां करावी, असें वाटण्याचें कारण नाही ! स्नेह तर त्यांत आहेच, पण साहजिकताहि आहे. आरंभिलेला उद्योग आबालवृद्धांना सारखा उपयोगी आहे, हें समजल्याखेरीज त्यांचें समाधान होणार नाही.

'महाभारतांत काय काय आहे' हें म्हणण्यापेक्षा 'महाभारतांत काय नाही' असें म्हणणेंच सयुक्तिक आहे. अलीकडच्या भाषेंत बोलावयाचें तर असें म्हणतां येईल की महाभारत हें या भारतराष्ट्ररूपी चिरंतन पुरुषाचें अंतर्मन आहे. (subconcious mind) त्याच्या प्रकट अप्रकट सर्वच अस्तित्वाचा संग्रह बीजरूपाने त्यांत आहे. हल्लीच्या विचार संभ्रमांच्या आणि विकारसंमोहाच्या काळीं त्याचें परिशीलन होणें अत्यंत पथ्यकर आहे. साऱ्या मार्यंत बोलावयाचें तर हें एक यथार्थ वीररसात्मक काव्य आहे. मध्वमुनीश्वराने वर्णिल्याप्रमाणे 'शृंगारप्रिय सर्व लोक बनले झाले विलासी महा' अशा हल्लीच्या काळीं तर वीररसाचा परिपोष करणाऱ्या या काव्याचें परिशीलन फारच उपयुक्त आहे. महाभारतांत नाही काय, असें जर मला कोणी विचारलें तर मी तरी हेंच सांगेन की महाभारतांत शृंगार नाही, आजकालचा पाचकळपणा नाही. 'महाभारतकृता शृंगार—वीर—करुणादि काव्यरसानामाविष्कृतिरेवन कृता अपितु एकैकस्य रसस्य एकैको ऱ्हद एव निर्मितः' असें जरी बाळशास्त्र्यांनी म्हटलें असलें तरी त्याचा अर्थ इतकाच की महाभारताला शृंगार व हास्य यांचा विटाळ नाही. विराटपर्वातील तुरळक प्रसंग सोडले तर उपमादृष्टांतापलीकडे शृंगाराचा संबंध येतच नाही व तशा स्थळींहि खऱ्या वीरवृत्तीचा हा भारतपुरुष छोटया स्टेशनावरून धावत जाणाऱ्या मेलगाडीप्रमाणे धावत जातो. स्त्री म्हणून स्त्रीच्या सावलीलाहि तो उभा रहात नाही. इतकेंच तर काय, आपली वाणी किती मधुर आहे हें सांगतांना ती कोकिळेप्रमाणे आहे, हें सांगणें देखील त्या शूर मर्दाला रुचत नाही. ती कोकिळा (पुंस्कोकिल) प्रमाणे आहे, असें तो आवर्जून सांगतो !

तिसऱ्या खंडास म. म. मिराशीं यांची प्रस्तावना आहे. ती त्यांच्या लौकिकास साजेशीच आहे. महाभारताचीं संस्करणें इ. कित्येक बाबतींत, त्यांनी अर्वाचीन संशोधनशास्त्राचा अवलंब केला आहे. तरी पण 'इतिहासोत्तमात् अस्मात् जायन्ते कविबुद्धयः' हें किती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यथार्थ आहे हें त्यांनी साऱ्या संस्कृत काव्योदधीचें मंथन करून सुंदर रीतीने दाखविलें आहे.

महाभारत स्वतःच स्वतःला 'इतिहासोत्तम' म्हणत आहे. शास्त्र, कला, वाङ्मय इ. प्रत्येक बाबतींत भारतवर्षाचा असा स्वतःचा विशेष दृष्टिकोण असतो. त्याच दृष्टीने महाभारत स्वतःस 'इतिहासोत्तम' म्हणतें. चित्रकलेंत व्यक्तिसादृश्यावर त्याचा भर नाही. प्रतीकत्वाने (type) मिळणाऱ्या सामान्य सूचनेवर आहे. इतिहासांतहि त्याची तीच दृष्टि आहे. अमुक एक घटना फा. वा॥ ३ स घडली का वै. शु॥ २ स घडली याला तो फारसें महत्त्व देत नाही. एका ठराविक कालखंडांतील अनेक घटनांनी जी सामान्य सूचना मिळते, ती या सर्व इतिहासाचें सार असतें. त्या सारासच महाभारत 'इतिहासोत्तम' म्हणतें व त्याचा संग्रह निष्ठापूर्वक करतें. महाभारताचा संक्षेप करावयाचा म्हणजे त्यांत कथासूत्र तर अविछिन्न हवेंच. पण अशा प्रतीकात्मक घटना सूक्ष्मरूपाने कां होईना जितक्या जास्त, तितका तो संक्षेप प्रभावशाली आणि महाभारताचें संपूर्ण दर्शन घडविणारा जास्त, या दृष्टीने प्रस्तुत संक्षेप हा उपलब्ध कोणत्याहि संक्षेपापेक्षा जास्त प्रामाणिक आहे हें कोणालाहि मान्य करावेंच लागेल.

अशा प्रकारच्या प्रयत्नांत मुख्य महत्त्वाचें काम जें पाठभेद निश्चित करण्याचें ते महाभारताचे बाबतींत किती दुर्घट आहे, हें म. म. मिराशी यांनी सांगितलें आहेच. चित्रशाळेचे पाठ प्रमाण मानून संपादक मंडळीनी या बाबतींतलें काम सुकर करून घेतलें आहे. हल्लीच्या काळी जेथे संस्कृत कमिशनचीं नाटकें करीतकरीतच संस्कृतला मृत भाषा म्हणून तिची कायमची बोळवण केली जाते की काय अशी भीति उत्पन्न झाली आहे, तेथे एवढी मोठी कल्पना काढून ती इतक्या थोड्या वेळांत यशस्वी करून दाखविणारे श्री. सरनाईक अभिनंदनास पात्र आहेत; परंतु कोरड्या अभिनंदनांनी जनता त्यांच्या ऋणांतून मुक्त होणार नाही. वर सांगितल्याप्रमाणें संस्कृतची सध्या दुर्दशा असल्यामुळे 'प्रकाशकः अष्टसहस्त्रकैः ऋणबद्धः' याचें आश्चर्य वाटण्याचें कारणच नाही. अशीं कामें पुष्कळ अंशीं महदाश्रयावर सिद्धीस जातात. 'केन्द्रशासनम् दिल्ली, तथैव प्रांतीय शासनानि प्रार्थितानि सहायार्थम्। किन्तु न कोऽपि आश्रयाधारो भूतः'। हा त्यांचा अनुभव लक्षांत घेऊन जनता-जनार्दनास त्यांनी मारलेली करुण हाक तिच्या कानीं जावो अशी शुभेच्छा आहे. अशीं पुस्तकें बहुधा विद्यापीठें व पुस्तकालयें यांच्याच संग्रहार्थ असतात हें जरी खरें असलें, तरी श्री. दिवाकर यांचें Even for individuals, it would not be a heavy burden, if one is really a lover of books and of our traditional culture हें म्हणणें ही कांही खोटें नाही. पण तो really शब्द मध्ये आहे ना!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

मराठीचा मोहोर

[संग्राहक व प्रकाशक: डॉ. ना. गो. नांदापूरकर, 'आशीर्वाद' इस्लीवन, कुतबीगुडा, हैदराबाद, मूल्य १ रु. २५ नवे पैसे. पृ. ८४]

लोकसाहित्य हें जनतेचें एकप्रकारें खरें मानधन आहे. पूर्वापार चालत आलेल्या ग्रामीण जीवनाचें, संस्कृतीचें, रीतिरिवाज व मानपानादींचें तें अभिमानास्पद असें जिवंत चित्र आहे. अशा या उच्च दर्जाच्या लोकसाहित्याची उपेक्षाच होत असल्याचें दिसून येतें. त्यामुळे आजच्या यांत्रिक युगांत तें बऱ्याच प्रमाणांत लोपलें जात आहे. वस्तुतः अलिखित पण अक्षरवाङ्मयांत मोडणाऱ्या लोकसाहित्याचें जागरूकतेने अधिकाधिक संशोधन होणें-त्याच्या विविध अंगांचें सम्यक् दर्शन घडविणें अत्यावश्यक आहे. अलीकडे सरकारचें व कांही साहित्यिकांचें तिकडे थोडें लक्ष वेधलें गेलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. त्या दृष्टीने मराठवाड्याचे ख्यातनाम साहित्यिक व संशोधक डॉ. ना. गो. नांदापूरकर यांचे प्रयत्न विशेष महत्त्वाचे वाटतात. 'माहेरचं मराठी' या सुंदर लोकगीतसंग्रहानंतर त्यांनी आता 'मराठीचा मोहोर' ह्या उत्कृष्ट लोकगीतसंग्रहाने मराठी साहित्यभांडारांत मोलाची भर घातली आहे यांत संदेह नाही.

डॉ. नांदापूरकर हे एक चतुरस्र लेखक आहेत. मराठी भाषेचा आणि बोलीचा त्यांचा जाज्वल्य अभिमान त्यांच्या विचारपरिप्लुत वाङ्मयांतून प्रकर्षानें प्रगट होतो. 'माहेरचं मराठी' व 'मराठीचा मोहोर' या संग्रहाने तर तो स्पष्ट होतोच पण स्वाक्षरी करतांना 'मराठीचा पाईक' या मायन्याने त्यांच्या अस्सल मराठी प्रकृतीचें दर्शन घडतें. त्यांच्या दोन्ही संग्रहांत ग्रामीण जीवनाचें व संस्कृतीचें मनोरम प्रतिबिम्ब उमटलें असून तें अंतःकरणावर कोरलें गेल्याशिवाय रहात नाही. 'माहेरचं मराठी' या लोकगीतसंग्रहांतील कांहीओव्या पाहा : 'नमस्कार' या गीतांत—

वृंदा वृंदा तुळशी वृंदा । येवढी प्रीत गोविंदा
गोविंदापाशीं माझं मन । गोविंद भेटले जनार्दन ॥
तीर्थ घ्या तुळशीचं । पाप जातं जन्माचं
जन्म—जन्मींची सोयरी । तिचा वास भीमातीरीं ॥
मोत्याचं कंवळं । सोन्याच्या धारा ॥
पंच रुद्रीं राज्य करा ॥

आणि मग 'प्रदक्षिणा' या गीतांत बारा प्रदक्षिणांचं माहात्म्य दर्शविण्यांत येतें. आध्यात्मिक स्वरूपाच्या अशा कांही उच्च प्रतीच्या गीतांबरोबर संस्कृतिसंबंधीच्या उत्कट भावनांचें सुंदर दर्शन या संग्रहांत घडतें.

चांगुलपणाला । कशाला यनीफनी ।
गोरी ग माझी मैना । रूप तुझं गेंदावानी ॥
अति चांगुलपन । माझ्या जिवाला घासत ।
सांगते मैनाला । चालूं नको ग हासत ॥

अथवा शेजारधर्मासंबंधी—

शेजारिणी बाई । तुझं माझं एकचित्त ।
नको घालूं आड – भिंत ॥
शेजारिणीबाई । एका दरवाजानं वागूं ।
तुझी मैना माझा राघू । दोन्हीं खेळतेत ॥

असे बोधप्रद धडे देण्यांत येऊन सुख—दुःखाच्या, आशा-आकांक्षांच्या अनेक सुरस गोष्टी लोकगीतांत आविष्कृत करण्यांत आल्या आहेत. 'मराठीचा मोहोर' तर अधिकच बहरून आला आहे. तो सुगंधित व आल्हाददायक आहे. या संग्रहांत उदात्त व निर्मळ भावभावनांचे निर्झर झुळझुळ वहात असून चित्त कसें प्रसन्न होतें ! आणि ग्रामिणांची मनोदेवता निर्विकारपणें आपल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारगंगेचें पावित्र्य प्रदर्शित करण्यास कशी पुढे सरसावली आहे याचें मनोज्ञ दर्शन घडतें. सुबोध भाषा, घाटदार रचना, सुंदर कल्पनाविलास, उदात्त विचारधारा आणि रम्य उपमा, अलंकार आदींचें वैभव 'मराठीचा मोहोर' या संग्रहांत कसें भरदार व उठावदार दिसतें ! या वैभवाचे खरे घनी अशिक्षित पण सुसंस्कृत खेडुत स्त्री-पुरुष आहेत. विशेषतः ग्रामीण स्त्रियांचीं लोकगीतें त्यांचे उंची अलंकार आहेत. ते त्यांनीच घडविले असून भावी पिढीला त्यांनी ते प्रदान केले आहेत. सरस्वतीच्या वरदानाने त्यांच्या कंठांतून प्रस्फुटित झालेले प्रासादिक, अर्थपूर्ण असे जीवनस्पर्शी बोल कुठे नमूद केले गेले नाहीत, लिहून ठेवण्यांत आले नाहीत; ते परंपरेने वाचेवाचे-वरून सारखे तरंगत आले आहेत. म्हणूनच ते अमर आहेत. जुनी पिढी जसजशी नामशेष होत जाते तसतसे ते अकृत्रिम बोलहि लोप पावत असतात आणि म्हणूनच आजच्या आधुनिक काळाच्या ओघांत त्या मान-धनाला मूठमाती मिळूं नये, ते मंत्रबोल जिव्हेवरून ढळूं नयेत अशी दखल घेणें अगत्याचें आहे, याची जाणीव 'मराठीचा मोहोर' या संग्रहाचें रसग्रहण करतांना कोणाहि सहृदय वाचकाला झाल्यावाचून रहाणार नाही. वानगीदाखल कांही ओव्या पहा :

तुळसावाई वाळून कोळ झाली
कातून माळ केली । अन् हुरदीं वागविलं ॥
तुळशीचं नांव । कंठींत कोरलं ।
रात न दिवस । हुरदीं वागविलं ॥
तुळशीची पूजा । नित्तेचा नेम माझा
जाऊ माझ्या जलमला । पतिवर्ते संग तुझा ॥

किंवा—

भरली चंद्रभागा । भरली दोही थडी
संकटीं घाली उडी । सावळा पांडुरंग ॥
भरली चंद्रभागा । उतार कोन्या काठीं
तारू झाला जगजेठी ॥

अशा किती तरी प्रासादिक, आत्मिक भावनांचा मोहोर या संग्रहांत फुलला आहे. तद्वतच समाजांतील सर्व थरांच्या एकात्मतेचें, जिव्हाळ्याचें हृदयंगम चित्रण लोकगीतांच्या ओवीओवींतून केलें गेलें आहे. मातृप्रेम, बन्धुप्रीति, पतिनिष्ठा, सासू–सासऱ्यासंबंधीचा सद्भाव, पुत्रवात्सल्य, पितृभक्ति, माहेर व सासर यांतील भेद, कौटुंबिक जिव्हाळा आदि नाना प्रकारच्या संबंधांचा हृद्य परामर्षहि या संग्रहांतील लोकगीतांत आढळून, ग्रामीणांच्या अकृत्रिम व उच्च भावाविष्काराच्या अस्मितेचा प्रत्यय येतो. पाहुण्यासंबंधी आपुलकीचे हे उद्गार पहा—

पाव्हन्याला पाव्हनचार । खडीसाखर पुरनांत
। तूप केळीच्या दुनींत ॥
पुरनाची पोळी । तूप लावून करते मऊ
। शेतकरी माझा भाऊ ॥
माझ्या घराला पाव्हना । तुपानं चूळ भरी
लवंगानं दात कोरी । बंदू सोयरा माझा ॥

आणि भावजयीसंबंधीच्या नितांत प्रेमाची ही ओवी पहा :

सावळी भावजय । शुक्राची चांदनी
चंद्र डुलतो आंगनीं । भाई राजस माझा
माझ्या बांधवापरीस । माझी मालन देखनी
अशी बसरीला उभी । जशी दऊत–लेखनी..

अथवा—

कपाळीचं कुंकू । घामानं वल्ल झालं
भावजय सावळे । तुझ्या पायीं दैव आलं

आणि गुरुसंबंधीचे आत्मीयतेचे बोल वाचा :

प्रपंच साधूनी । परमार्थ साधीयेले
शेवटीं देव झाले । समर्थ गुरुराय
देहाचा देवपाट । आत्म्याच्या केल्यां वाती
पंचप्राणाची आरती । गुरुरायाला माझ्या

तसेंच सौभाग्याचें प्रतीक असलेल्या कुंकवासंबंधीचे उदात्त शब्द पहा :

भर्ताराचं सुख । सांगते देवाद्वारीं
कुखाच्या करंड्याला । खिडक्या नानापरी
गोठपाटल्याचं । मजला होतं वझं
कपाळीचं कुंखू । नाजुक लेनं माझं

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

सोन्याचे गोठ तोडे । नाही माझ्या खातरांत
कपाळीचं कुंकू । नित्ते पहाते आरशांत

अवीट गोडीचीं अशीं अनेक रसाळ लोकगीतें मनाला भारून टाकतात. ' माहेरचं मराठी ' आणि ' मराठीचा मोहोर ' या संग्रहांतील लोकगीतें संपूर्ण मराठवाड्यांतील सर्व थरांमधलीं असलीं तरी तशीं लोकगीतें नाग–विदर्भांतहि विपुल आहेत. उभ्या मराठी मुलुखांत संस्कृतिसाधर्म्य कसें एक आहे, रीतिरीवाजाचें व व्यवहाराचें भावदर्शन कसें सारखें आहे हें लोकगीतें प्रत्ययास आणून देण्यास समर्थ आहेत. भरली चंद्रभागा, माहेर, गोरीचं गोरेपण, वाटच्या वाटसरा, पंढरपुरामध्यें, हुरहूर, वोळवण, चोळी, गर्भाची वाढ, तुझा माझा भाऊपणा इत्यादि लोकगीतें मराठवाड्याप्रमाणे भंडारा जिल्ह्याच्या झाडीपट्टींत व नाग–विदर्भांतहि अगदी तशींच प्रचलित आहेत. यावरून संपूर्ण मराठी प्रदेश एका संस्कृतीने, एका हृदयाने नि रितिरिवाजाने कसा एक आहे याची प्रचीति येते.

लोकसाहित्याचें संपादन व संकलन करणें जिकिरीचें, जोखमीचें व कष्टाचें काम आहे. पण हें कार्य मनावर घेतलें तर तसें कांही अवघड नाही. आपल्या उज्जवल संस्कृतीचा व आचारधर्माचा लोकसाहित्य हा एक आरसाच आहे. तो अधिक स्वच्छ व दैदिप्यमान राखण्यास मराठी मुलुखांतील लेखकांनी झटावें अशी कोणीहि मराठीचा अभिमान बाळगणारी व्यक्ति अपेक्षा करील. खरोखरीच डॉ. नांदापूरकर यांनी बरेच परिश्रम घेऊन लोकगीतांचे दोन उत्तम संग्रह सादर करण्यांत मराठीचा बहुमान केला आहे. लोकसेवेचें एक मोठें कार्य केलें आहे म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

ना. रा. शें.

पायवाट

(कवितासंग्रह; कवि–बाबा मोहोड, प्रकाशक–प्र. दि. वेदरकर, महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती. पृष्ठें १४ + ११२. किंमत ३। रुपये)

कवि बाबा मोहोड यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह. तो अंतर्बाह्य उत्कृष्ट आहे हें प्रथम सांगून टाकतों. श्री. मोहोड यांच्या कविता प्रामुख्याने ' युगवाणी 'तूनच माझ्या वाचनांत आल्या होत्या व त्याच वेळीं वैदर्भीय कवींच्या तरुण पिढींत या कवीसाठी मानाचें पान राखून ठेवावें लागेल असा अंदाजहि मीं स्वतःशीं केला होता. तो अंदाज, आज ह्या संग्रहांतील कवितांच्या एकत्रित वाचनाने खरा ठरल्याचें प्रत्ययास येत आहे ! विदर्भाच्या परिसरांत एवढ्यांत नजरेंत ठसण्याजोगीं पुस्तकें प्रकाशित होत आहेत आणि योगायोग असा कीं त्यांत काव्यसंग्रहांचीच पुस्तकें प्रमाणाने अधिक आहेत. यापूर्वी सौ. उषा लिमये यांचा 'विसावा', सौ. शांताबाई दंडिगे यांचा 'एकदाणी', श्री. राम शेवाळकर यांचा 'असोशी' आणि श्री. पुरुषोत्तम कुळकर्णी यांचा 'मेघा' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. (श्री. ना. रा. शेंडे यांचाहि एक काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे; पण कवींखेरीज इतरहि नात्यांनी ते सुपरिचित असल्याने त्यांचा उल्लेख केला नाही.) आज श्री. बाबा मोहोड यांच्या 'पायवाट' या संग्रहाने मराठी काव्यांत चांगली भर पडत आहे.

मात्र ही काव्यतपस्या श्री. मोहोड यांना सुखासुखी करतां आलेली नाही. पांचसहा वर्गांपलिकडे त्यांचें शिक्षण झालेलें नसूनहि अनुभवाच्या शाळेंतून जें कांही त्यांना कळलें त्याची काव्यरूपांतील ही अभिव्यक्ति इतकी रेखीव व प्रसन्न आहे की रसिकाचें मन मुग्ध होऊन जावें !— स्वतःच्या काव्यनिर्मितीची जी मीमांसा त्यांनी केलेली आहे ती या दृष्टीने वाचनीय आहे. स्वतःच्या कवितेला ते 'जीवसखी' म्हणतात आणि यामुळेच त्या जीवसखीशीं केलेला हृदयसंवाद उत्कट व यामुळेच अकृत्रिम वाटतो.

आजचा कवि हा सामान्यतः समाजाभिमुख वृत्तीचा आहे. व्यक्तिनिष्ठा आणि समाजनिष्ठा या त्याच्या व्यक्तिमत्वाच्या दोन बाजू आहेत. म्हणूनच वैयक्तिक सुखदुःखांच्या भावना जशा त्याच्या काव्यांत साकारतात, तशाच, सामाजिक विषमतेंतून उद्भवलेल्या विचारलहरींनाहि तो शब्दरूप देत असतो ! श्री.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मोहोड यांच्याहि काव्यांतून हा दुहेरीपणा प्रकट होत आहे.

रंग प्रीतिचे तुझ्या कपोलीं
ओठांवरतीं हसें कोवळें
हृदयीं माझ्या स्पंदन कातर
मृदु आंदोलन जगावेगळें
(जीवन जळतें · ·)

असे उद्गार काढणारा कवि पुढच्याच कवितेंत

सत्याच्या काठचा माणूस उघडा
वाजवील केव्हा क्रांतीचा चौघडा
रस्त्याच्या काठच्या दुवळ्या मानवा
रुद्राचें रूप तूं घेशील केधवा ?

असाहि प्रश्न साऱ्या दुवळ्या मानवजातीला विचारतो !—सामाजिक अन्यायामुळे विषण्ण अन्. क्रुद्ध होणाऱ्या कविमनाचें दर्शन 'गिरणींत', 'होईल जव्हा स्फोट अणूचा', 'कौलारूच्या घरांत तुटक्या' इत्यादि कवितांत घडतें. समाजाविषयी अनुकंपा बाळगणें हा त्यांच्या मनाचा धर्म असल्यानेच 'एकला चालला' हें भूमिक्रांति करण्यासाठी एकाकी निघालेल्या 'उद्याच्या शांतीच्या साकार पुतळ्याचें—विनोबाजींचें' —शब्दचित्र ते सरसतेने रेखाटूं शकले !

निसर्गाचें कविमनाला घडलेलें दर्शन हें तर आधुनिक मराठी कवितेचें एक व्यवच्छेदक लक्षण आहे. नवतेच्या वेगडी कल्पनांनी क्षणमात्र गेलेला तोल सावरून मराठी काव्य पुन्हा साधेपणावर स्थिर होत आहे. हा साधेपणा निर्माण करण्यांत कवींना निसर्गाने फार साह्य केल्याचें दिसून येतें. किंवहुना, निसर्गाला व्यक्तिरूप देऊन त्याचें बहुविध सौंदर्य वेचक शब्दांनी टिपून घेणाऱ्या वालकवींचाच संप्रदाय आज मराठी काव्यांत प्रामुख्याने प्रभाव गाजवीत आहे असें दिसून यईल. या लुप्तप्राय झालेल्या संप्रदायाला श्री. मंगेश पाडगांवकर यांनी चालना दिली व मराठी कवींच्या तरुण पिढीने या कार्यांत सक्रिय भाग घेतला !— श्री. मोहोड यांचींहि निसर्गगीतें निसर्गाला व्यक्ति कल्पून लिहिलेलीं आहेत. त्यांची पायवाट ही थकून पाचोळ्यांत विसावते व आभाळाच्या भाळावर त्याच्या यामिनीस नीज येते. आणखी पुढील कांही कल्पना पहा—

करी वठला पिंपळ
वाऱ्यासवें हातवारे
आणावया आकाशींचे
धरेवर निळे तारे ! (पायवाट).
हळूंच येतें
आकाशाच्या नयनीं पाणी
हळूच सुटतो
वायूच्या अंगाला कंप. . . (हळूच येतें).

श्री. मोहोड यांच्या काव्याचें सामान्यपणें हें रूप आहे. त्यांच्या काव्याचें मार्मिक रसग्रहण करणारी सौ. कुसुमावती देशपांडे यांची प्रस्तावना व डॉ. वि. भि. कोलते व प्रा. भ. श्री. पंडित यांचे पुरस्कार प्रस्तुत संग्रहाला लाभले आहेत. प्रस्तावनेच्या शेवटीं सौ. कुसुमावतीबाईंनी लिहिलेलें वाक्य येथे उद्धृत करतों. त्या लिहितात—' जें साधलें त्याच्या यशांत व त्याच्या सहजसिद्धींत गुंतून पडण्याचा मोह फार मोठा. त्यांतून आमच्या अल्पसंतुष्ट वऱ्हाडी मनाला तो मोह फारच आकर्षक. त्यापासून स्वतःला वचावण्याचें सामर्थ्य व जागरूकता वावा मोहोड यांना लाभावी हीच रसिकांची इच्छा असणार. ' त्यांचा हा इशारा श्री. मोहोड यांनाच नव्हे तर साऱ्याच उदयोन्मुखांना मार्गदर्शक ठरणारा आहे असेंच कोणीहि म्हणेल !

श्री. य. गो. जोशी यांच्या आनंद मुद्रणालयाची कलात्मक छपाई व चित्रकार गोडसे यांचें वघत रहावें इतकें रंगरमणीय प्रतीकात्मक चित्र यांचा समन्वय घडवून आणण्यावद्दल व पुण्या—मुंबईच्या तोडीचीं सुंदर पुस्तकें विदर्भ प्रदेशांतून प्रकाशित करण्याची धडाडी दाखविल्यावद्दल प्रकाशक श्री. वेदरकर यांचें अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाही. मात्र पुस्तकाची सव्वातीन रुपये किंमत ही अव्वाच्या सव्वा वाटते !

व. कृ. व.

३ गारंबीचा बापू

(लेखक—श्री. ना. पेंडसे, मौज प्रकाशन, मुंबई. पृष्ठें २५२—मूल्य ५ रुपये.)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रस्तुत कादंबरीची पहिली आवृत्ति १९५२ च्या डिसेंबरांत प्रकाशित झाली होती. प्रस्तुतची आवृत्ति हें तिचेंच पुनर्मुद्रण आहे. ही कादंबरी प्रथम प्रकाशित झालीं तेव्हाच अत्यंत लोकप्रिय ठरली होती. केवळ चार वर्षांच्या आंत प्रस्तुत कादंबरीची द्वितीयावृत्ति काढावी लागली हें त्या लोकप्रियतेचेंच प्रत्यंतर होय. कितीदाहि वाचलें तरी ज्यांतील गोडी व नावीन्य कमी होत नाही अशा पुस्तकांत या कादंबरीची खुशाल गणना करावी. बापू, विनोबा सामल, राधा, भूतवाडीची मावशी, अण्णा खोत, दिनकर इत्यादि व्यक्तिरेखा लेखकाने इतक्या कौशल्याने व हळुवारपणें रेखाटल्या आहेत की त्याद्वारें गारंबी–भूतवाडी–साखरपेंडी आदि गावांतील व्यक्तिजीवन साक्षात् डोळयापुढे साकार व्हावें ! कधीहि कोकण न पाहिलेल्या माणसांनाहि कोकणच्या मातीचा कण न् कण परिचित वाटावा ! 'हत्या' ही श्री. पेंडसे यांची चवथी कादंबरी नुकतीच मुंबई सरकारने १९५६ सालच्या मराठी कादंबरींतील सर्वश्रेष्ठ कादंबरी म्हणून गौरविलेली. पण त्याहि कादंबरीपेक्षा 'गारंबीचा बापू' ही कादंबरी केवळ मलाच नव्हे, तर अनेक साक्षेपी रसिकांना श्रेष्ठतर वाटते.

ज्ञानसागरांतील शिंपले

(संग्राहक—गो. सी. गोखले. प्रकाशक—अ. स. वैद्य, यशवंत प्रकाशन, ६८९।२४ सदाशिव, पुणें २. पृष्ठें २०८. मूल्य अडीच रुपये.)

अनेकदा वाचनाच्या ओघांत बऱ्याच उपयुक्त, नावीन्यपूर्ण आणि मनोरंजक गोष्टी येत असतात. परंतु त्या गोष्टींचा संग्रह करण्याइतका साक्षेप वाचकाच्या अंगीं बहुधा नसल्याने त्या गोष्टींचा लवकरच विसर पडतो. परंतु हा साक्षेप बाळगून श्री. गोखले यांनी वाचनांत येणारी गोष्ट टिपून ठेवण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत पुस्तक हें त्या प्रयत्नांना आलेलें सुंदर फळच होय.

या पुस्तकांत काय आहे हें सांगाण्या पेक्षा काय नाही हें पाहणेंच कमी कष्टाचें आहे. प्रस्तुत ग्रंथाचे शेवटीं सूचि दिलेली आहे. (ती प्रारंभीं दिली असती तर अधिक इष्ट झालें असतें) तिच्या केवळ अवलोकनानेच या ग्रंथाच्या व्यापकतेची कल्पना येऊं शकेल. पुस्तकाचीं वाङ्मय व अध्यात्म, शरीरशास्त्र, प्राणिशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, विविध विषय, ज्योतिषशास्त्र, वनस्पतिशास्त्र, व्यावहारिक गोष्टी आणि करमणूक अशीं नऊ प्रकरणें आहेत व यांतून वेदांतील 'कर्म' या शब्दाच्या स्पष्टीकरणापासून तर

'कराग्रेवसते लक्ष्मी... करमध्ये च बिस्किटम्
करमूले तु चहापात्रम् । प्रभाते कपदर्शनम्'

अशाआधुनिक प्रातःस्मरणापर्यंत विविध रंजक, उद्बोधक अशा वेच्यांचा समावेश केलेला आहे. कोशकार चिं. ग. कर्वे यांची प्रस्तावना आणि दर पृष्ठावरील एकेक सुभाषित यांनी पुस्तकाला विशेष सौंदर्य प्राप्त झालें आहे. मात्र या सुभाषितावरोबरच ते कोणी उच्चारलें वा लिहिलें, तसेंच तें मुळांत कोठे आलें आहे याचा उल्लेख केला गेला असता तर माझ्यासारख्या, विशेष वाचन न करतां बहुश्रुतपणाचा आव आणूं पाहणाऱ्या अनेक 'व्यासंगी' व्यक्तींची सोय होऊं शकली असती ! नागपूरच्या एम्प्रेस मिल्समध्ये 'असिस्टंट वीव्हिंग मास्टर'च्या हुद्यावर काम करीत असता त्यांनी हा साक्षेप दाखविला हें त्यांना खचित अभिनंदनीय व इतरांना अनुकरणीय आहे ! प्रस्तावनेंत श्री. कर्वे यांनी त्यांचें नाटक-कथा-कादंबरी यांचें वाचन नसल्याबद्दल कौतुक केलें आहे व आमच्या तरुणांना हा आदर्श आहे असें म्हटलें आहे. दुसऱ्यांना लाभ देण्याच्या हेतूने केलेलें वाचन हें नाटक–कादंबऱ्यांच्या 'स्वार्थी' वाचनाच्या तुलनेने चांगलें आहे, असा प्रस्तावना लेखकाचा आशय दिसतो. त्यांचें हें विधान अर्थातच मला मान्य नाही.

व. . व.

"माणसाच्या गोष्टी"

(लेखक—अं. शं. अग्निहोत्री; मौज प्रकाशन, मुंबई; पृ. १७८; मूल्य रु. ३॥)

"चार पांचशेंवर कथा लिहूनहि ज्यांचा अद्यापि एकहि कथासंग्रह प्रसिद्ध झाला नाही त्या अं. शं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अग्निहोत्री, यांचा आजच्या कथाकारांत मोठ्या मानानें उल्लेख करावयास हवा. इतकें विपुल कथालेखन करूनहि त्यांचा एकहि कथासंग्रह आजवर प्रकाशित होऊं नये ही मराठी वाचकांची रसिकता ?" असे उद्‌गार सुप्रसिद्ध टीकाकार व लघुनिबंधकार प्रा. म. ना. अदवंत यांनी काढलेत ते यथार्थ नाहीत असें कोण म्हणेल ? " माणसाच्या गोष्टी " हा कथासंग्रह प्रसिद्ध झालेला पाहून सर्व रसिक वाचकांना समाधान वाटेल यांत शंका नाही. 'मौजें'त दर आठवड्याला एक कथा लिहूनहि त्यांच्या कथांत तोच तोपणा आढळत नसून पात्रांत विविधता, प्रसंगांत निराळेपणा स्पष्टपणें प्रतीत होतो. मध्यमवर्गीय माणसाचें 'माणूस' ह्या नात्यानें 'माणसाच्या गोष्टीं'त माणसानें घडविलेलें दर्शन मोठें हृदयंगम आहे.

'आवांचा मुलगा', 'लग्नीनवेडा', 'वेडा बाळकृष्ण', 'दगड' 'गांवभावजी', 'दत्तूचे काका', 'आजोबाची बहीण' इत्यादि व्यक्तिरेखा वाचकांचें चित्त आकर्षित करून घेतात. प्रेतांना अंत्य संस्कार देण्यावर ज्याच्या संसाराची इमारत उभी आहे अशा, स्मशानांत मंत्राग्निचें काम करणाऱ्या, काळीज नसलेल्या राघोभटाचें शब्दचित्र त्यांच्या कलापूर्ण चित्रणाची साक्ष पटवून देतें. जीवंत आहे तोपर्यंत कुणाचें प्रेत कोणत्याहि परिस्थितींत मंत्राग्निशिवाय जळणार नाही हें वडिलांचें बीद्र राखणे हाच त्याचा बाणा.

'एक कुटुंब', 'राम लक्ष्मणाची गोष्ट', 'पीळ' ह्यांतून एकत्र कुटुंब पद्धतींतून निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांचें चित्रण मोठ्या प्रत्ययकारी पद्धतीने त्यांनी केलें आहे. स्त्रिया, पैसा व मुलें ह्यांना सांभाळलें की "एक कुटुंब" सुखासमाधानानें नांदूं शकतें असें त्यांनी दाखवून दिलें आहे. परंतु स्वार्थानें अंध झालेली दृष्टि कुटुंबाची कशी वाताहत करते, आयुष्याचे घिडवडे कसे होतात व शेवटीं डोळ्यांत पाणी येऊन "तेव्हा गेला होता कोठे" असें म्हणावेसें वाटतें.

स्त्रीजीवनांतील वैवाहिक समस्या व इतर आनुषंगिक प्रश्न 'अगतिक', 'मिळमिळीत सौभाग्य', 'कसायाच्या मुली', 'अनुदार', 'दृष्टि बदलली पाहिजे', 'गोविंदरावाच्या सात मुली', 'तिचा प्रयोग', इत्यादि कथांतून त्यांनी मोठ्या चतुराईने हाताळले आहेत. प्रेमाचा संसार समाधानानें करण्याऐवजी अगतिक होऊन संसाराच्या गाड्याला जुंपण्याचा प्रसंग आल्यास जीवन कसें दुःसह होतें याचें चित्रण हृदयाला चटका लावणारें आहे. अमावास्येसारख्या काळ्या कुरूप कोळश्याप्रमाणे असणाऱ्या नर्मदेचा प्रयोग कितपत योग्य आहे असा वाचकांना प्रश्न पडतो.

'म्हातारी मेल्याचें दुःख नाही पण'—ह्यांत घडणाऱ्या स्वार्थी जीवांचें दर्शन व त्या पार्श्वभूमीवर 'माणसांत जमा नसलेला माणूस' ह्यांतील गोखल्याचें ध्येयदर्शी जीवन वाचकांना स्तंभित करतें.

भाऊची सुखासंबंधी तळमळ, त्याची मानसिक व्यथा, 'भाऊचें दुखणें' व 'निर्भेळ सुख आणि निर्भेळ दुःख' ह्यांतील आत्या, सुखी करण्याच्या हट्टानें सर्व जण झटत असतांना आधी दुःख नंतर सुख मिळाल्याने तिला गुदमरल्यासारखें होत असतें.

निवेदन शैली चित्तवेधक मोहक व रेखीव स्वभावचित्रें, आणि प्रसन्न वातावरण यांमुळे साऱ्या कथा वाचनीय झाल्या असून त्यांच्या कथाविश्वांतील अनेक व्यक्ति वाचकांच्या स्मरणांत राहतात. दुसरा कथासंग्रह लवकरच वाचकांच्या हातीं पडेल अशी आशा करावयास हरकत नाही.

रा. प्र. अ.

भावसरिता

(कवितासंग्रह; वा. भा. दामले. प्रकाशक: के. भि. ढवळे, कर्नाटक हाऊस, गिरगाव, मुंबई २. पृष्ठें १६५ : मूल्य तीन रुपये.)

'भावसरिता' हा श्री. वा. भा. दामले यांच्या स्फुट कवितांचा दुसरा संग्रह. त्यापूर्वी 'भावलहरी' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला होता व त्यायोगें कविमंडळांत त्यांना मान्यताहि प्राप्त झाली होती. प्रस्तुत संग्रहांत त्यांच्या एकूण एकेचाळीस कविता समाविष्ट केल्या आहेत. व त्या तत्कालीन कवितेचें स्वरूप विशद करण्याच्या दृष्टीनें समर्थहि आहेत. संग्रह जरी सन् १९५६ सालीं प्रकाशित होत असला तरीहि विषय,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभिव्यक्ति आदि साऱ्याच बाबतींत कवीच्या काव्याचें वळण 'जुनेंच' आहे. इतकें जुनें की त्यांच्यापूर्वीच्या केशवसुतांचें काव्यहि 'नवें' वाटावें ! चंद्रशेखर, बी यांच्या काव्यासारखेंच तें 'जुनाट' म्हणतां येईल. मात्र जुनाट म्हणजे वाईट नव्हे ! व्यक्ति ही सनातन असल्यामुळे सामान्यतः तिचें जीवनानुभवहि थोड्याफार फरकाने सारखेच असतात. नवीनता असते ती बहुधा त्या अनुभवाच्या अभिव्यक्तींत !–'भावसरिता' या काव्यसंग्रहाच्या बाबतींतहि असेंच म्हणतां येईल. श्री. दामले यांची वृत्ति बहुधा विचारकाची असल्यानेच त्यांच्या काव्याचें स्वरूपहि संथ, गंभीर व संश्लिष्ट असें झालें आहे. वर्डस्वर्थ, कीटस् यांच्या काव्यांचा अनुवाद; रुक्मिणीपत्रिका, चूडालाख्यान यासारख्या स्वतंत्र व अनुवादस्वरूप कविता, स्वातंत्र्याची तळमळ व शिवकालीन मराठी शौर्याचा दृढ अभिमान हीं त्यांच्या काव्याचीं ठळक वैशिष्टयें सांगतां येतील. त्यांच्या या संग्रहांतील अत्यंत मनोरम असा भाग म्हणजे 'अंतरंगकल्लोळ' या शीर्षकाखालील एकाहत्तर अभंगांतून त्यांनी केलेला आत्मानुभूतीचा आविष्कार हा होय. आधीच अभंग हा छंद मनांतील विचार-भाव यांच्या उत्कट आविष्काराच्या दृष्टीने अत्यंत योग्य. त्यांत प्रत्यक्ष जीवनांतील अनुभव मोजक्या शब्दांत व्यक्त करण्यांत आल्याने हा सारा भागच मनोरम झालेला आहे.

मात्र सारेंच काव्य अशाप्रकारें विचारजड आहे असें नाही. उपहास व विडंबन यांचा आधार घेऊन वाचकांना खुलविण्याचें कवीचें कसबहि प्रस्तुत संग्रहांतील कांही कवितांतून प्रगट होतें. 'आम्ही कोण ?' या कवितेंत समाजांत उगीच पुढेपुढे करून आपलें महत्त्व प्रस्थापित करूं पाहणाऱ्या लोकाग्रणींचें जें चित्रण केलें आहे तें आजच्या 'समाजसेवकां'चेंच चित्रण वाटावें ! पण यापेक्षाहि 'मिस थर्टिएट' या कवितेंत अडतीस सालच्या नवशिक्षित तरुणींचें जें चित्रण कवीने केलें आहे तें मुळांतूनच वाचण्यासारखें आहे. बानगीदाखल त्यांतल्या कांही ओळी उद्धृत करण्याचा मोह अनावर होतो. ह्या मिस् थर्टिएटला जुनें अवजड लुगडें पेलत नाही. 'मऊ झिरझिरी अस्मानी वा पोपटरंगी' (अशीं Light Coloured) पातळें विकच्छ नेसायला' हिला पाहिजे, असें सांगून कवि पुढे वर्णन करतो–

डेट कोणची स्वीमिंग् रेसची बालुनिया डायरी
काढुनी चाळितसे वरिवरी
उगिच वदावें किती वाजले पदरा सरसावुनी
दाविण्या घड्याळ अपुलें जनीं
लेट जाहला लेक्चर माझें ठरलें की पांचला
माफ करा, उशीर होईल मला.
हीं अशीं कितितरी वाक्सुमनें उधळुनी
हँडकरचिफ्ने उगिच मुखा लिपुनी
साय्कल्वरतीं टांग सदा मारुनी
विजलित्र आली भूवर वाटे नभास कंटाळुनी
टकमकां जन पाहति लोचनीं. (पृ. ४३)

एकंदरींत, वीस वर्षांपूर्वीच्या सर्वसामान्य व्यक्तीच्या मनांतील भाव-भावनांचें दर्शन या संग्रहांतील कवितांद्वारें घडविलें जातें. भाषा, वृत्तें, शैली यांचें जुनेंपण मान्य करूनहि 'वाग्देवीवंदन' या कवितेंत कवि कवितेकडून जी अपेक्षा करतो त्यानुसार 'मनुजमन संमोहुनि सुखविण्याचें' सामर्थ्य या संग्रहांत निश्चितच आहे.

गोंधळ

(कवितासंग्रह–प्रकाशक – बी. एस्. कुळकर्णी संचालक, धाराशिव प्रकाशन, उस्मानाबाद, मराठवाडा (नवें मुंबई राज्य) पृष्ठें ३८. मूल्य बारा आणे.)

गोंधळ या शीर्षकाखाली मराठवाड्यांतील सात कवि–कवयित्रींच्या कवितांचें संकलन करण्यांत आलें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या प्रारंभीं 'चोखंदळ मराठी रसिकाला' उद्देशून संकलनकार म्हणतात, '···प्रत्येक मंगलकार्याची सांगता 'गोंधळ' घालून करावयाची हा कुळाचारच आहे आपला. शतकानुशतकांच्या ताटातुटीनंतर आज उर्वरित महाराष्ट्र मराठवाड्याशीं एकदम होत आहे; यापेक्षा अधिक मोठें मंगलकार्य तें कोणतें? पण–या गोंधळाची आमची बिदागी मात्र जबर आहे हं ! तुझ्या इमानाला जागून तुझा खराखुरा अभिप्राय धाढ आम्हाला '

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी स्वतःला चोखंदळ रसिक म्हणवून घेत नसलों, तरी अभिप्राय मात्र खराखुरा वाटत आहे.

मला वाटतें, संग्रहाला दिलेलें गोंधळ हें नांव निव्वळ विनयाने दिलें नसून त्यांत वस्तुस्थितीचेंहि दिग्दर्शन आहे. 'गोंधळ' शब्दांतून दैवताला आळविण्याची भक्ति व्यक्त होते. फलेला तेथे वाव नसतोच. प्रस्तुत संग्रहांतल्या कविता वाचून हीच भावना मनांत निर्माण होते. कवितेंतून 'काव्या' पेक्षा मराठी भाषेवरील प्रीतीच व्यक्त होतांना दिसून येईल. श्रीकृष्णप्रतिज्ञा, भारतयशगुणगान, भामास्वप्न, ज्ञानभांडार लुटूं या, मकरसंक्रांत ह्यासारख्या कवितांतून हा दोष विशेष जाणवतो. अभिव्यक्ति व विषय या बाबतींत अर्वाचीन मराठी काव्यांत आलेल्या स्थित्यंतराची जाणीव कवींना जवळ जवळ नाही असेंच म्हणावें लागतें. नाही म्हणावयास 'तुझ्यांत मीं वितळावें' 'जातांना जा' (सौ. सुहासिनी इर्लेकर), 'मी' 'विहंग होउनी' (सौ. उषा जोशी) या कविता यशस्वी व चांगल्या वाटतात. जागतिक विषमतेची जाणीवहि कांही कवितांतून व्यक्त झाली आहे. पण ती उसनी असल्यामुळे कृत्रिम वाटते. नवकाव्यांतील दुर्बोधता आक्षेपार्ह आहे असें म्हणतां म्हणतां कांही कवि मुद्दाम दुर्बोधतेच्या आधाराने नवकवि बनूं पाहतात. प्रस्तुत संग्रहांतील एका कवितेचें शीर्षक पहा : रॉन्डीव्हुतले काव्य रन्डुले—! या कवितेंतील कांही कडव्यांचा (जवळ जवळ सर्वच म्हणाना) अर्थ मला किंचित्तसासुद्धा कळला नाही. कवि म्हणतो—

लनुकलान्तिची शान्ति इरादुन
  युगायुगाची वखवखलेली
अध्यात्माची शाल लपेटुन
  रॉन्डीव्हुत त्या पूर्व पातली
पश्चिम तेथे देखुन स्मोकत
बूटकोट अन् घालून पॅन्टी
नतमस्तक पूर्वेला खोकत
पुरुष असावा ही सरटेन्टी

प्रस्तुत कविता ही कदाचित मर्ढेकरांच्या कांही कवितांच्या विडंबनाच्या हेतूंतून निर्माण झाली असावी. पण तरीहि विडंबनालासुद्धा कांही पातळी असते. थट्टा करतोंच म्हटलें की ती कशाचीहि करतां येईल, महाराष्ट्रशारदेच्या दरबारांत 'गोंधळ' करण्यास सिद्ध असलेल्या शब्दांची अशी वायफळ उधळपट्टी करण्याने शारदेची पूजा होईल असें मला तरी वाटत नाही. किंबहुना, मराठवाडा–विदर्भ या सारख्या साहित्याच्या प्रांगणांत अजून नवख्या मानण्यांत येणाऱ्या प्रदेशांतील व्यक्तींनी तरी आपलें साहित्यप्रकाशनाचें पाऊल टाकतांना तें प्रगतीला साह्यभूत होईल याच हेतूने व व विचारपूर्वक टाकणें अगत्याचें आहे. माझी ही सूचना प्रकाशक पुढील प्रकाशनांचे वेळीं ध्यानांत घेतील अशी अपेक्षा बाळगतों.

य. कृ. व.

श्री समर्थ रामदास

(लेखक—श्री. विठ्ठल वामन हडप, प्रकाशक—श्री. केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाऊस, चिराबाजार. मुंबई २, मूल्य—बारा आणे.)

बाल म्हणजे ६ ते ९ वर्षांच्या वाचकांना, २२ पृष्ठांत, ११ गोष्टीद्वारें, श्री. हडपांनी समर्थ रामदास स्वामींचें चरित्र निवेदन केलें आहे. पुस्तकाची भाषा रसाळ असून अखेरपर्यन्त गुंगवून ठेवणारी आहे. (बाल) वाचकांस सहज वाचतां यावें म्हणून, पुस्तक ठळक अक्षरांत छापलें असून, प्रत्येक गोष्टीच्या सुरवातीस आणि शेवटीं असें मिळून २२ सुंदर रंगित चित्रेंहि समाविष्ट केलेलीं आहेत. श्री. गोडसे यांचे चित्रकौशल्य वाखाणण्यासारखें असून छपाईसुद्धा उत्कृष्ट अशीच असल्याने 'सुसंस्कार होण्यासाठी म्हणून अवश्य वाचावयास लावावें' अशा योग्यतेचें प्रस्तुत पुस्तक आहे.

—मुकुन्द

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ संशोधन मंडळ वार्ता

१७–२–५७ ला विदर्भ (मध्य प्रदेश) संशोधन मंडळाची वार्षिक सभा झाली. त्यांत गोंदिया येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनांत कविकुलगुरु कालिदास व भवभूति यासंबंधी संमत झालेल्या ठरावास पाठिंबा देण्यांत आला. त्याचप्रमाणे स्थानिक ऐतिहासिक अवशेष रक्षण करण्याची सरकारला विनंति करण्यांत आली.

हल्ली मुंबई राज्याने जिल्हावर्णनांच्या (गॅझेटिअर्स) पुनर्लेखनाचें काम हातीं घेतलें आहे. तेव्हा त्या राज्यांत नवीन समाविष्ट झालेल्या पूर्व मध्यप्रदेशाच्या मराठी जिल्ह्यांच्या वर्णनांचेंहि पुनर्लेखन व्हावें अशी राज्य सरकारला विनंति करण्याचा ठराव संमत करण्यांत आला.

केन्द्र सरकारच्या पुराणलेख विभागाध्यक्षांचें कार्यालय जें उटकमंड येथे आहे तें नागपूरला आणण्याबद्दल केन्द्र सरकारला विनंति करण्यांत आली. परंतु यावर सरकारचें नकारात्मक उत्तर आलें.

मागील जानेवारीपासून मे अखेर पावेतों कार्यकारी समितीच्या एकूण सहा सभा झाल्या.

खालील सद्गृहस्थ मंडळाचे नवीन सभासद झाले.

आश्रयदाते—१. श्री. चितामणराव पिपळापुरे, गोंदियावाले, सागर शहर.

साहाय्यक सभासद—१. डॉ. वामन शिवदास बारलिंगे, धरमपेठ, नागपूर. २ श्री. रामचंद्र मार्तंड हजरनवीस, अॅड्व्होकेट, धरमपेठ, नागपूर. ३ श्री. के. तु. मंगळमूर्ति, धरमपेठ, नागपूर.

आजीव सभासद—१. डॉ. महादेव सखाराम मोडक, धरमपेठ, नागपूर.

साधारण सभासद—१. श्री. रामभाऊ गावंडे, नागपूर. २ श्री. दि. मा. खेरकर, नागपूर.

मंडळास खालील देणग्या मिळाल्या.

(१) रा. ब. भा. रा. चांदोरकर यांनी कै. डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्या दुर्मिळ असलेल्या ज्ञानकोशाचे बावीस खंड देणगीदाखल देऊन मंडळास अत्यंत ऋणी केलें आहे. ही देणगी त्यांनी ९–३–५७ रोजीं मंडळास दिली.

(२) नागपुर इलेक्ट्रिक लाइट अॅण्ड पॉवर कंपनीने मंडळाच्या कार्याच्या वृद्धी-करिता रु. ३०० ची उदार देणगी देऊन मंडळास उपकृत केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्याख्यान--

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें, या संस्थेचे चिटणीस व सुप्रसिद्ध संशोधक श्री. शं. ना. जोशी यांचें 'श्री छत्रपति श्री शिवाजी महाराजांची शासनपद्धति' या विषयावर दि. ९-४-५७ रोजीं सुश्राव्य व्याख्यान झालें.

निबंधवाचन

दि. २-४-५७ रोजीं मंडळाच्या वार्षिकोत्सवप्रसंगी खालील संशोधकांनी, लो. डॉ. मा. श्री. अणे यांच्या अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर आपापले निबंध वाचले.

१. म. म. श्री. वा. वि. मिराशी--भवभूति आणि उंबेक.

२. प्रा. सुरेश म. डोळके--रामदासांची कविता कांही विचार.

३. श्री. स. ना. कुळकर्णी--पुराणान्तर्गत शिवस्वरूप.

४. श्री. दे. गो. लांडगे--कै. जानोजी भोसले यांचें विद्यमान राजेबहादूर रघोजी भोसले यांच्या व्रतबंधासंबंधीचें परिपत्रक.

५. श्री. श. वा. रानडे--(१) पटवर्धनांकडील धार्मिक देणगीसंबंधी दीडशें वर्षांमागील दोन पत्रें (टिप्पण) (२) आंभोरा व आंबेजोगाई या स्थळांस भेट. (टिप्पण)

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें यांच्या तर्फे पुण्यास भरविण्यांत आलेल्या चव्वेचाळिसाव्या वार्षिक समारंभाचे सुप्रसंगीं मंडळाच्या खालील सभासदांचे निबंध वाचण्यांत आले. हें संमेलन पुणें येथे दि. १, २ व ३ जून १९५७ या दिवशीं भरलें होतें.

१. म. म. श्री. वा. वि. मिराशी--पृथ्वीराजविजयांतील कलचुरिविषयक उल्लेख.

२. श्री. दे. गो. लांडगे--(अ) नागपुरांतील शंभर वर्षांपूर्वीचें एक ग्रामण्य. (ब) शिवणीचे एकनिष्ठ मुसलमान दिवाण.

इतर

औरंगाबाद येथील साहित्य संमेलनांतील ऐतिहासिक वस्तूंच्या प्रदर्शनाचें उद्घाटन विदर्भ संशोधन मंडळाचे कार्याध्यक्ष म. म. वा. वि. मिराशी यांच्या हातूत झालें. या प्रदर्शनांत विदर्भ संशोधन मंडळानें अनेक वस्तू पाठविल्या होत्या. मंडळाचे कार्यवाह श्री. दे. गो. लांडगे यांचें साहाय्य या कामीं घेण्यांत आलें होतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

श्री. य. गो. मालोदे
स्थानापन्न सरचिटणीस, वि. सा. संघ,
यांजकडून

केंद्रवृत्त, नागपूर

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

दि. १–६–५७ रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां वि. सा. संघ मंदिरांत कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचा २३ वा स्मृतिदिन साजरा करण्यांत आला. प्रारंभीं 'महाराष्ट्र गीत' म्हटलें गेलें. श्री. द. रा. गोममाळे, आमंत्रक, सां. का. समिति यांचें प्रास्ताविक भाषण झालें. नंतर मुख्य वक्ते श्री. **वा. दा. भोळे** यांचें भाषण झाल्यावर संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांचें समारोपाचें भाषण झालें. प्रा. माणिक, के. वैंजुले, सहआमंत्रक सां. का. समिति यांनी आभार मानले. सदरहू कार्यक्रमांस म. म. मिराशी, सौ. विमलाबाई देशपांडे आदि साहित्यप्रेमी उपस्थित होते.

निरोप समारंभ

प्रा. सौ. **कुसुमावतीबाई देशपांडे** यांची बदली दिल्ली येथे झाली त्यानिमित्त त्यांस वि. सा. संघातर्फे निरोप देण्याचा समारंभ दि. ६–६–५७ ला सायंकाळीं ७ वाजतां करण्यांत आला. सदर प्रसंगीं पूर्वाध्यक्ष, संघाध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, चिटणीस, कार्यकारी मंडळाचें नागपुरस्थ सभासद व म. म. मिराशी, सौ. विमलाबाई देशपांडे इत्यादि प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. प्रारंभीं स्थानापन्न सरचिटणीस श्री. मालोदे यांनी प्रास्ताविक भाषण करून वि. सा. संघातर्फे प्रा. सौ. कुसुमावतीबाईस प्रेमपूर्वक निरोप देण्याच्या कार्यक्रमाच्या प्रयोजनाची सार्थकता निवेदन केली. नंतर संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी वि. सा. संघातर्फे प्रा. सौ. कुसुमावतीबाई यांना पुष्पहार अर्पण करून वि. सा. संघाला व्यवस्थित स्वरूप देण्याच्या त्यांच्या कामगिरीचा गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला. प्रा. सौ. कुसुमावतीबाई यांनी उत्तरादाखल केलेल्या भाषणांत वि. सा. संघाचें स्वरूप नुसत्या भिंती व विटा न राहतां नवीन साहित्य व साहित्यिक यांच्या कर्तबगारीचें तें केंद्रस्थान राहावें अशी मनीषा प्रगट केली. चिटणिसांच्या आभार-प्रदर्शनानंतर अल्पोपहार होऊन हा गोड कार्यक्रम संपला.

माननीयांची भेट

दि. २५–६–५७ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां मुंबई मराठी साहित्य संघाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. बापुराव शिवराम नाईक, येथील गव्हर्नमेंट प्रिंटिंग आणि स्टेशनरी डिपार्ट-मेंटचे नवे मॅनेजर व सौ. नाईक यांनी वि. सा. संघास भेट दिली. श्री. बापूराव नाट्य-प्रेमी असून नाट्यगृहासंबंधी त्यांचा सखोल अभ्यास आहे. स्थानापन्न सरचिटणीस श्री. मालोदे यांनी वि. सा. संघाच्या कार्यालयाची सर्व माहिती करून दिल्यानंतर श्री. नाना-साहेब जोग यांच्या समवेत त्यांनी वि. सा. संघाच्या रंगमंदिराच्या चालू कामाचें सूक्ष्म निरीक्षण केलें. यावेळीं येथील सुप्रसिद्ध नाटककार श्री. तात्यासाहेब भोळे यांजबरोबर नाट्यवाङ्मय व नाट्यगृह यासंबंधी उद्बोधक चर्चा झाली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परीक्षा समिति वृत्त

केंद्राधिकाऱ्यांना विनंती—

(१) सर्व केंद्राधिकाऱ्यांनी २४ व २५ ऑगस्ट ५७ मध्ये होणाऱ्या परीक्षांना जास्तींत जास्त प्रमाणांत परीक्षार्थी परीक्षेस बसविण्याचा प्रयत्न करावा.

(२) सर्वांनी आपल्या केंद्राचीं परीक्षार्थी आवेदनपत्रें जास्तींत जास्त २५ जुलै ५७ च्या आंत कार्यालयाकडे सशुल्क पाठवावींत.

(३) केंद्राधिकारी पुरस्कार परस्पर कापून न घेतां संपूर्ण परीक्षाशुल्क एकत्रित—एकदाच सरचिटणीसांकडे पाठवावें.

(४) गतसत्रांत व चालू सत्राकरितां ज्यांनी परीक्षार्थी आवेदनपत्रें पाठविलीं नाहीत, अशांना यापलीकडे 'युगवाणी'चा अंक पाठविला जाणार नाही.

सुविधेसंबंधी नियम—

(५) जानेवारी ५७ मध्ये झालेल्या परीक्षेंत परीक्षेस न बसलेल्या परीक्षार्थ्यांना पुनश्च त्याच शुल्कांत यापुढे परीक्षेस बसतां येणार नाही. कोणत्याहि कारणास्तव, कोणत्याहि परिस्थितींत परीक्षार्थ्यांना परीक्षा शुल्कांत सुविधा मिळणार नाही, याची कृपा करून दखल घ्यावी.

साहित्य पारंगत परीक्षा—

(६) या परीक्षेचें आवेदनपत्र परीक्षार्थ्यांनी त्वरित परीक्षासमितीच्या कार्यालयाकडे भरून पाठवावें. साहित्य पारंगतचा अभ्यासक्रम वेगळा छापला आहे. ९ आण्यांचीं तिकिटें पाठवून माहितीपत्रक मागवावें.

नागपूर १ — **रा. पु. सगदेव**
दि. २५-६-१९५७ — संचालक, परीक्षा समिति, वि. सा. संघ

महाराष्ट्र—साहित्य—परिषद्, पुणें २

"अमृतानुभव"—संशोधन

महाराष्ट्र—साहित्य—परिषदेने "अमृतानुभव" या ग्रंथाची संशोधनपूर्वक अधिकृत आवृत्ति सिद्ध करण्याचें कार्य आरंभिलें असून प्रा. वा. दा. गोखले यांची ह्या कामीं नियुक्ति झाली आहे. "अमृतानुभव" हा ग्रंथ सर्वमान्य आहे. अनेकांच्या वाचनांत तो आहे. तरी ज्या संस्थांकडे वा विद्वानांकडे किंवा वारकरी आदि संप्रदायातील भक्तमंडळींकडे या ग्रंथाच्या हस्तलिखित पोथ्या असतील त्यांनी या बाबतींत परिषदेशीं सहकार्य करावें अशी विनंती आहे. पोथ्यांसंबंधीं कृपा करून माहिती कळवावी म्हणजे पुढील योजना करणें होईल.

(पत्ताः—महाराष्ट्र—साहित्य—परिषद्, टिळक रस्ता, पुणें—२)

पुणें
दिनांक २९—६—१९५७ — **य. दि. पेंढरकर**
चिटणीस

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✳ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जाहीर विनंती

विदर्भ साहित्य संघाचें नवीन वर्ष १ एप्रिल ११५७ पासून सुरू होत असून नवीन वर्षाकरिता सभासद-नोंदणी सुरू झाली आहे. वयाचीं २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठी-भाषाप्रेमी व्यक्तीला सभासद होतां येतें. नव्याने सभासद होणारांना आवेदनपत्र भरून द्यावें लागतें. साधारण सभासदाची वार्षिक वर्गणी फक्त रु. तीन आहे. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यांत येतात. सभासदांचे वर्ग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **उपकर्ते**—पांच हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(आ) **आश्रयदाते**—एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.
(इ) **सहाय्यक**—पांचशें किंवा अधिक रुपये देणारे.
(ई) **हितचिंतक**—अडीचशें किंवा अधिक रुपये देणारे.
(उ) **आजीव सभासद**—पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.
(ऊ) **साधारण सभासद**—वार्षिक तीन रुपये देणारे.

वर्गणी येण्यास उशीर झाल्यास युगवाणीचे अंक नियमितपणें पाठविण्यांत गैरसोय होते. तरी गैरसोय टाळण्याकरिता नवीन सभासद होऊं इच्छिणारांनी व जुन्या सभासदांनी त्वरित वर्गणी पाठवावी पाठवावी अशी नम्र विनंती आहे. सभासदनोंदणीकरिता ज्यांचेजवळ अधिकृत पावतीपुस्तकें दिलीं आहेत त्या कार्यकर्त्यांचीं नांवें सोबत दिलीं आहेत. त्यांजवळ किंवा कार्यालयांत वर्गणी जमा करून पावती घ्यावी ही विनंती आहे.

दरवर्षी वि. सा. संघाचे सभासद वाढविणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना व साहित्यप्रेमिकांना त्यांनी ह्या वर्षीहि सभासदनोंदणीला मदत करावी अशी विनंती आहे. ज्या कार्यकर्त्यांना पावतीपुस्तकें हवीं असतील त्यांनी तशी कृपया मागणी करावी.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर

वि. सा. सं. चीं अधिकृत पावतीपुस्तकें ज्यांचेजवळ आहेत त्या कार्यकर्त्यांची यादी व पत्ते

अमरावती १ प्रा. मा. ल. व्यवहारे, खापर्डे बगीचा. २ श्री. कृ. त्र्यं. पेशकार, देवस्थळी यांचा बंगला, अंबापेठ. **हिंगणघाट** : श्री. रा. वि. करपे, लक्ष्मी टॉकीजजवळ. **धामणगांव** : श्री. श्री. पुं. कठाळे. **चांदा** : श्री. ज. गो. संत, मधुवन कस्तुरबा मार्ग. **रामटेक** : श्री. कृ. पां मैराळ, श्रीराम विद्यालय. **भंडारा** : श्री. वि. बा. शब्दे, जिल्हा ग्रंथपाल. **किनगांवजट्टू** : श्री. वि. भ. देशपांडे, वकील. **वणी** : श्री. म. ता. राजूरकर. **खामगांव** श्री. वि. ए. तारे, गो. से. महाविद्यालय. **गोंदिया** : श्री. बा. का. देशमुख, वकील, सिव्हीललाइन. **वर्धा** : श्री. र. वि. करंदीकर, वकील, महादेवपुरा. **पुसद** : १ श्री. दि. बा. जकाते, २ श्री. भा. श्री. केसकर. **यवतमाळ** : श्री. दि. य. महाजन, वकील. **बुलढाणा** : श्री. मा. ग. डोंगरे, वकील. **वाशीम** : श्री. कृ. भ. देशपांडे, वकील. **नागपूर** : १ श्री. रा. पु. सगदेव, प्रभानिवास जेल रोड; २ श्री. ना. हि. सोनटक्के, त्रिवेदी ब्राह्मोसमाज चाळ, उत्तर बझार रोड, ३ श्री. नानासाहेब जोग, गोखले विहिला, कांग्रेस नगर; ४ श्री. श्री. ग पांढरीपांडे, धंतोली; ५ श्री य. गो मालोदे, नागजीभाई टाऊन, सीताबर्डी; ६ प्रा. श्री. गो. काशीकर, सुपेकरांचें घर, धरमपेठ; ७ श्री. पां. बा. गडकरी, वॉकररोड, सर्कल क्र. ६; ८ श्री. तु. वि. गेडाम, महारपुरा, सीताबर्डी; ९ श्री. मनोहर खोलकुटे, महाल, नागपूर.

हें मासिक श्री पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ